


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १२५ * नांदेड * मंगळवार, दि. १२ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत, वर्क फ्रॉम होमला प्राधान्य द्या, खाद्यतेलाचा कमी वापर करा

## सलग दुसऱ्या दिवशी पंतप्रधान मोदी यांचे देशवासियांना आवाहन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम आशियातील संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पुन्हा एकदा आवाहन केलं आहे. खाद्यतेलावर परकीय चलन जास्त प्रमाणात खर्च होतं. त्यामुळे त्याचा कमी वापर करावा. तसेच शक्य तिथे ऑनलाईन मिटिंग घ्याव्यात, शाळांनी ऑनलाईन क्लासेस घ्यावेत असं आवाहनही मोदींनी केलं.



पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्व भूमीवर या आधीही पंतप्रधानांनी देशावासियांना काही आवाहनं केली होती. त्याम ध्ये पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करा, वर्षभर सोन्याची खरेदी करू नका, तसेच शक्य तिथे सार्वजनिक वाहनांचा वापर करा असं मोदी म्हणाले होते. आज सलग दुसऱ्या दिवशीही पंतप्रधानांनी तेच आवाहन पुन्हा एकदा केल्याचं दिसून आलं.

देशातील १४० कोटी लोकांनी फक्त एक पाऊल पुढे टाकलं तर १४० कोटी पावलं आपण पुढे जाऊ. त्यामुळे कोणतंही संकट आपल्या विकासाला अडचण ठरू शकणार नाही, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

तसेच जोपर्यंत परिस्थिती ठीक होत नाही तोपर्यंत सोनं खरेदी करू नका, भारतीयांमध्ये डेस्टिनेशन वेडिंगचा ट्रेंड वाढतोय. त्यामुळे परकीय चलनाचा साठा भरपूर खर्च होत आहे. डेस्टिनेशन वेडिंगसाठी परदेशाला प्राधान्य देऊ नका. देशात अनेक ठिकाणं ही लग्नांसाठी योग्य आहेत. यासह खाद्यतेलावर जास्त परकीय चलन खर्च होतं. त्यामुळे त्याचा वापर कमी करा, विदेशी साहित्यापेक्षा देशी उत्पादनांना प्राधान्य द्या. स्थानिक दुकानदारांकडूनच खरेदी करा, असे आवाहनही पंतप्रधान मोदी यांच्याकडून करण्यात आले आहे.

### राहुल गांधी यांची टीका

हे उपदेश नसून गेल्या १२ वर्षांतील अपयशाचे पुरावे आहेत. देशाला अशा वळणावर आणून ठेवले आहे की, आता जनतेला काय खरेदी करावे, कुठे जावे आणि काय करू नये हे सांगावे लागत आहे. स्वतःची जबाबदारी झटकण्यासाठी प्रत्येक वेळी जनतेवर दोष जनतेवर ढकलून देतात. देश चालवणे आता 'कॉम्प्रमाईज्ड' पंतप्रधानांच्या हातातील गोष्ट राहिलेली नाही, अशी टीका विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे.

### मोदींच्या इंधन बचतीच्या आवाहनानंतर केंद्र सरकारचं स्पष्टीकरण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पेट्रोल-डिझेल आणि गॅसचा वापर जपून करण्याचं आवाहन केल्यानंतर केंद्र सरकारने महत्त्वाचं स्पष्टीकरण दिलं आहे. देशात पेट्रोल, डिझेल, एलपीजी किंवा कच्च्या तेलाचा कोणताही तुटवडा नसून नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे. भारताकडे ६० दिवसांचा कच्च्या तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा साठा उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली.

# जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार अॅलर्ट मोडवर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** मध्य पूर्वेतील (पश्चिम आशिया) वाढत्या संघर्षाचे पडसाद संपूर्ण जगभरात उमटत असताना, भारत सरकारने संभाव्य धोके ओळखून अत्यंत सावधगिरीची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. देशांतर्गत परिस्थिती आणि पुरवठा साखळी स्थिर ठेवण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी 'अनौपचारिक अधिकार प्राप्त मंत्रिगटाची' एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. सुमारे दीड तास सखोल चर्चा झालेल्या या बैठकीत प्रामुख्याने देशाची ऊर्जा सुरक्षा आणि सर्वसामान्यांसाठी आवश्यक असलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेवर लक्ष केंद्रित करण्यात आले.

या उच्चस्तरीय बैठकीला केंद्रीय आरोग्य व रसायन-खते मंत्री जे. पी. नड्डा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यासह सरकारमधील अनेक महत्त्वाचे मंत्री उपस्थित होते. परदेशातील युद्धजन्य स्थितीमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला बसू शकणाऱ्या संभाव्य धक्क्यांचा या वेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत होणाऱ्या अनपेक्षित वाढीचा थेट परिणाम भारतीय बाजारपेठेवर होऊ नये, यासाठी या बैठकीत महत्त्वपूर्ण धोरणांवर चर्चा झाली. देशात घरगुती वापराचा एलपीजी गॅस, वाहनांसाठी लागणारे पेट्रोल-डिझेल आणि कृषी क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या खतांचा कोणताही तुटवडा निर्माण होऊ नये, यासाठी तातडीच्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. बैठकीनंतर माध्यमांना माहिती देताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी स्पष्ट केले की, पश्चिम आशियातील सद्यस्थिती मुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची दाट शक्यता असली तरी, देशांतर्गत पातळीवर कोणतीही कमतरता भासू नये याची पूर्ण काळजी घेतली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सज्ज असून, पुरवठा साखळी अबाधित ठेवण्यासाठी सर्व यंत्रणा अतिशय प्रभावीपणे काम करत आहेत.

जागतिक पातळीवर तणाव असला तरी देशातील नागरिकांनी विनाकारण घाबरून जाऊन वस्तूंची साठेबाजी करू नये, असे आवाहन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले आहे. परदेशातून येणाऱ्या पुरवठा साखळीत कोणताही मोठा अडथळा येऊ नये, यासाठी सरकारने आधीच ठोस आणि पर्यायी व्यवस्था निर्माण केली आहे. या जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी केवळ सरकारी प्रयत्नांवर विसंबून न राहता लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# देशभरात जुलैपासून 'जी राम जी'ची सुरूवात

## मनरेगा कायदा रद्द होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** विकसित भारत रोजगार हमी आणि उपजीविका मिशन (ग्रामीण) म्हणजेच विकसित भारत जी राम जी ची कायद्याची अंमलबजावणी देशभरात एक जुलैपासून सुरू होणार आहे. केंद्र सरकारने सोमवारी अधिसूचना जारी केली आहे.

विकसित भारत जी राम जी कायदा लागू होत असल्यामुळे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) २००५ त्या दिवसापासून रद्द होईल. नवीन रुपरेषेनुसार ज्या ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्य स्वेच्छेने अकुशल शारीरिक काम करण्यास तयार असतील, त्या कुटुंबाला प्रत्येक आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या वेतन रोजगाराची वैधानिक हमी मिळण्याचा हक्क असेल.



मजुरांना वेळेवर आणि पारदर्शी पद्धतीने मजुरीचे पैसे दिले जाणार असून, कामगारांना त्यांच्या बँक खात्यात किंवा पोस्टाच्या खात्यात थेट लाभ रक्कम जमा होईल. मजुरी साप्ताहिक आधारावर किंवा हजेरी नोंद (मस्टर रोल) बंद झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत दिली जाणे बंधनकारक करण्यात आले आहे. असे न झाल्यास, कामगारांना कायद्यातील तरतुदींनुसार विलंबाबद्दल भरपाई मिळणार आहे. या योजनेसाठी आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये केंद्र सरकारने ९५,६९२.३१ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात मोठी वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)–** सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सरकारकडून महागाई भत्त्यात आता मोठी वाढ करण्यात आली आहे. यामुळे आता कर्मचाऱ्यांना अतिरिक्त पगार मिळणार आहे. याबाबत सरकारने एक पत्रक जारी केले आहे. यानुसार, महागाई भत्त्यात आला २ टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सरकारी नोकरदारांना ६० टक्के महागाई भत्ता मिळणार आहे. यामुळे आता सरकारी नोकरदारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# सर्पदंशाची अफवा; विषबाधेमुळे दोन चिमुकल्या बहिणींचा दुर्दैवी मृत्यू

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील चिखली गोकुळनगर येथे दोन सख्ख्या चिमुकल्या बहिणींच्या मृत्यूच्या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सुरुवातीला या दोघींचा मृत्यू सर्पदंशामुळे झाल्याची अफवा होती. मात्र, गोकुंदा उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने ही अफवा फेटाळत दोन्ही बालिकांचा मृत्यू विषबाधेमुळे झाल्याचे स्पष्ट केले आहे.


गोकुळनगर चिखली येथील सई दिलीप मुंगल (वय ४) हिचा दि.८ मे रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर तिची मोठी बहीण श्रुष्टी दिलीप मुंगल (वय ६) हिचाही ९ मे रोजी रात्री आदिलाबाद येथील रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे मुंगल कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून चिखली परिसरात शोककळा पसरली आहे.



दरम्यान, या घटनेबाबत गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्ता केंद्रे यांनी स्पष्ट केले की, संबंधित दोन बालिकांना सर्पदंश झालेला नव्हता. दूषित अन्न सेवन केल्यामुळे त्यांना विषबाधा झाली होती आणि त्यातूनच त्यांचा मृत्यू झाला. याच दिवशी अंदबोरी येथील एका शेतकऱ्याला नागाने दंश केल्याची घटना घडली होती. दंशानंतर संबंधित व्यक्तीवर गावातच खाजगी उपचार करण्यात आले. सुमारे एक तासानंतर त्यांना रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला, अशी माहितीही डॉ. केंद्रे यांनी दिली.

सर्पदंश झाल्यास कोणत्याही प्रकारचे खाजगी उपचार न करता तातडीने शासकीय रुग्णालयात रुग्णाला दाखल करावे. वेळेत उपचार मिळाल्यास रुग्णाचा जीव वाचू शकतो. उपजिल्हा रुग्णालयात आवश्यक औषधे उपलब्ध असल्याचेही डॉ. केंद्रे यांनी सांगितले.

# राज्यात पुन्हा उष्णतेची लाटसदृश्य स्थिती



**मुंबई (प्रतिनिधी)–** पुढील चार दिवस राज्यातील काही भागात उष्णतेची लाटसदृश्य स्थिती राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. यामुळे नागरीकांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागणार आहे.

राज्यात एप्रिल महिन्यात विदर्भात अनेक दिवस उष्णतेची लाटसदृश्य स्थिती कायम होती. या दरम्यान तापमानाचा पारा ४५ ते ४६ अंशांवर पोहोचला होता. मागील काही दिवसांपासून राज्यात बहुतांश भागात पश्चिमी विक्षोभाच्या (वादळाच्या) स्थिती मुळे पावसाची नोंद होत होती. यामुळे नागरिकांना तीव्र उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला होता.

गुजरात आणि राजस्थान येथील काही भागांत उष्णतेची लाटसदृश्य स्थितीची नोंद होत आहे. तसेच राजस्थान येथे काही ठिकाणी धुळीची वादळेही निदर्शनास येत आहेत. तर राज्यातही मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागातील कमाल तापमानात वाढ नोंदली जात आहे. दरम्यान, रविवारी राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत तापमानाचा पारा ४० अंशांवर पोहोचला. यामुळे राज्यात पुन्हा उन्हाचा तडाखा वाढताना दिसत आहे.

# एमआयडीसीत उद्योगाऐवजी जुगार अड्डा! चार जणांना अटक, दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

## नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या सिडको एमआयडीसी भागात आदित्य वजन काट्याजवळ सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाने कारवाई केली. यावेळी चार जणांना अटक करून त्यांच्याकडून रोख रक्कम, जुगाराचे साहित्य असा दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन क्रॅक डाऊनअंतर्गत जिल्हाभरात अवैध व्यवसायाविरुद्ध धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. याच मोहीमअंतर्गत नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी आपले सहकारी पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे व त्यांच्या टीमला सूचना दिल्या.




मिळालेल्या माहितीवरून त्यांनी एमआयडीसी भागात असलेल्या आदित्य वजन काट्याजवळ सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर कारवाई केली. यावेळी पोलिसांनी विलास प्रल्हाद गजभारे (वय ४५ राहणार गोपाळचावडी नांदेड), नारायण बळीराम चिखलेवार (वय ५० राहणार बळीरामपूर नांदेड), प्रसाद संजय सूर्यवंशी (वय २३ रा. येळी ता. लोहा) आणि संदीप धोंडीबा जगदंबे (वय ३९ रा. वागलवाडा ता. उमरी) यांना अटक केली. जुगार अड्ड्यावरुन पोलीस दिसताच काहीजण पसार झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम, जुगाराचे साहित्य, मोबाईल, दुचाकी असा दीड लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिस अंमलदार समीर अहेमद यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात वरील चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांनी पथकाचे कौतुक करुन अभिनंदन केले आहे.

# आजपासून राज्यात पीसीएम सीईटी परीक्षेची सुरूवात

**मुंबई (प्रतिनिधी)–** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातफ (सीईटी कक्ष) अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व कृषी शिक्षण या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या संधीची सीईटी प्रवेश परीक्षा १२ ते २० मे दरम्यान सकाळी व दुपारी अशा दोन सत्रात घेण्यात येणार आहे. राज्यात दुसऱ्या संधीच्या सीईटीसाठी ३ लाख २१ हजार ९१७ विद्यार्थी प्रवेश परीक्षा देणार आहेत. पीसीएम समूहाच्या सीईटीसाठी राज्यात ३६ जिल्ह्यातील १९४ परीक्षा केंद्रावर ही परीक्षा होणार आहे.

पीसीएम समूहाच्या अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या संधीच्या सीईटीसाठी ३ लाख २१ हजार ९१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या नोंदणीमध्ये १ लाख ९७ हजार ८८३ विद्यार्थी, १ लाख २४ हजार ०७१ विद्यार्थीनी, १३ तृतीयपंथी व ९६८ दिव्यांग विद्यार्थ्यांचा सावेश आहे. ही सीईटी ऑनलाईन होणार आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांना यंदापासून प्रथमच पीसीएम समूहासाठी सीईटीच्या दोन संधी मिळत आहेत. पहिल्या संधीची सीईटी ११ ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत झाली. राज्यात पहिल्या संधीच्या सीईटीसाठी ४ लाख ७९ हजार ३३४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४ लाख ५४ हजार ७९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षेला ९४.७३ टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




# साईलाला गँगवर मोक्काअंतर्गत कारवाई; तिहेरी खून प्रकरणानंतर शहाजी उमाप यांच्या कार्यालयात प्रस्ताव दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तिहेरी खूनाची घटना झाल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणात दोघांचा घटनास्थळी तर एकाचा रुग्णालयात मृत्यू झाला होता. हे प्रकरण टोळी वर्चस्वातून झाले होते. अखेर यातील मुख्य साईलाला टोळीला पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणाहून अटक करून कारागृहात पाठविले. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्याकडे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी ११ जणांविरुद्ध मोक्का अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव सादर केला आहे.

यामध्ये साईसिंह ऊर्फ साईलाला दिपकसिंह गहरवार (वय २६, रा. बालाजी मंदीर कमान जवळ, सिडको, नांदेड) जयकुमार ऊर्फ सोनु कैलास राऊत (वय २३, मंजुरी रा. सुमेध नगर, नांदेड), शाकेर खान रशीद खान वय ३०, व्यापार रा. मिल्लतनगर, नांदेड), शेख शाहरुख ऊर्फ कबुतर शेख अजगर (वय २९, रा. खुदबेनगर चौरस्ता, महेबुबीश कॉलनी, नांदेड), शेख उबेद शेख अजगर (वय २३, बेकार रा. फेमस फंक्शन हॉल जवळ मिल्लत नगर, नांदेड), दिग्वीजय गणेशराव नारागुडे (वय २२, खाजगी काम रा. सावित्रीबाई फुले शाळेजवळ, शामनगर, नांदेड), मन्मत वसंतराव मंगरुळे (वय २५, पानशॉप रा. ग्री कॉलेजजवळ, लालवंडी रोड, ता. नायगाव, जि. नांदेड), नितेश परमेश्वर इंगळे (वय २२, शिवनगर, हनुमान मंदीरजवळ, नांदेड), गौरव दिपकसिंग गहरवार (वय ३०, व्यापार रा. शक्तीनगर, नांदेड), सय्यद आवेज सय्यद खलील (वय २७, रा. खुदबेनगर चौरस्ता, नांदेड (मयत), महंमद अरबाज महंमद फारुख (वय २३, रा. इदगाह मैदान, इतवारा, नांदेड (मयत), इलियास ऊर्फ काला इल्लुखान ईस्माइलखान (रा. खुदबेनगर चौरस्ता, नांदेड) यांच्यावर कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.




**नांदेड** : जिल्हा अभिवक्ता संघ नांदेडच्या निवडणुकीत एकता पॅनलचा दणदणीत विजय झाला. यावेळी जल्लोष साजरा करताना अध्यक्ष यदुपथ अर्धापूरकर, संगमेश्वर देलमाडे, दीपाली डोणगावकर, कपील पाटील, सुजाता बगाटे, मंगेश जामनीक, प्रदीप राठोड, अॅड. हाटकर, सटवाजी व्यंकटराव, अॅड. मठवाले, रामसिंघ पुरणसिंह आदी वकील मंडळी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# युद्धकाळातील आर्थिक संयम

इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यातील संघर्षाने मध्यपूर्वेतील तणाव अधिक तीव्र केला आहे. या पार्श्व-भूमीवर जागतिक आर्थिक मंदीचे सावट लक्षात घेऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काही आवाहनं केली आहेत. जसे पेट्रोल आणि डिझेलचा संयमित वापर करणे, परदेश दौरा टाळणे आणि सोने खरेदी न करणे. या मागचा उद्देश एकच की, या सगळ्यांमुळे आपले चलन दुसऱ्या देशात जाते अर्थात आपल्याला अधिक आर्थिक मंदीला तोंड द्यावे लागते. त्याचे परिणाम आता जागतिक अर्थकारणावर उमटू लागले आहेत. विशेषतः कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे भारतासारख्या आयातप्रधान देशांसमोर नवे आर्थिक संकट उभे राहत आहे. त्याचा सर्वाधिक परिणाम भारतीय रुपयाच्या घसरणीच्या रूपाने दिसून येत असून, यामुळे महागाई, आयात खर्च आणि आर्थिक स्थैर्याबाबत चिंता वाढली आहे. आपल्या देशात एकूण इंधन गरजेपैकी सुमारे ८५ टक्के इंधन आयात केले जाते. त्यामुळे जागतिक बाजारात तेलाच्या दरात किंचित वाढ झाली तरी त्याचा थेट फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसतो. तेल खरेदीसाठी भारताला मोठ्या प्रमाणावर डॉलर खर्च करावे लागतात. २०२५ मध्ये तेलाचे दर तुलनेने स्थिर असूनही भारताने १२० ते १४० अब्ज डॉलर्सपर्यंत खर्च केला. आता मध्यपूर्वेतील अस्थिरतेमुळे तेलाच्या किमती वाढत असल्याने डॉलरची मागणी अधिक वाढली आहे. परिणामी रुपयाचे मूल्य सतत घसरत आहे. गेल्या वर्षात रुपया सुमारे पाच टक्क्यांनी घसरला होता; मात्र चालू वर्षाच्या केवळ पहिल्या पाच महिन्यांतच त्यात ५.६४ टक्क्यांची घसरण झाली आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया ९६ च्या आसपास पोहोचल्यामुळे आयातदार आणि उद्योगक्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. रुपयाचे अवमूल्यन हे केवळ चलन बाजारातील तांत्रिक प्रकरण नसून, ते देशाच्या आर्थिक आरोग्याचे प्रतीक असते. चलन जितके कमकुवत होते, तितका आयात खर्च वाढतो आणि महागाईचा दबाव सामान्य नागरिकांवर अधिक तीव्र होतो. विशेषतः भारतातील अनेक कंपन्यांनी परदेशातून डॉलरमध्ये कर्जे घेतलेली आहेत. रुपया घसरल्यामुळे या कंपन्यांच्या परतफेडीचा खर्च वाढतो. व्याजाचा अतिरिक्त बोजा त्यांच्या नफ्यावर परिणाम करतो. काही प्रमाणात आयटी क्षेत्र आणि निर्यातदारांना याचा फायदा होतो, कारण डॉलरमधून मिळणारे उत्पन्न रुपयात अधिक मूल्याचे ठरते. मात्र, या फायद्यापेक्षा सामान्य माणसाला बसणारा महागाईचा फटका अधिक गंभीर आहे. जागतिक बाजारात तेलाचे दर स्थिर असले तरी कमकुवत रुपयामुळे भारतात पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किमती वाढतात. वाहतूक खर्च वाढल्याने जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीही वाढतात. अशा परिस्थितीत महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेला व्याजदर वाढवावे लागू शकतात. परंतु व्याजदर वाढले की, गृहकर्ज, वाहनकर्ज आणि उद्योगांसाठीचे कर्ज महाग होते. परिणामी उद्योग गुंतवणूक मंदावते आणि आर्थिक वाढीवर परिणाम होतो. अमेरिकेतील आर्थिक धोरणांचाही भारतावर मोठा प्रभाव पडतो. अमेरिकेत महागाई वाढल्यास तेथील फेडरल रिझर्व्ह व्याजदर वाढवते. यामुळे जागतिक गुंतवणूकदार उदयोन्मुख बाजारपेठांमधून पैसा काढून अमेरिकन बाजारात गुंतवणूक करतात. कारण तेथे अधिक सुरक्षितता आणि जास्त परतावा मिळतो. चालू वर्षात परकीय पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून २१ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक रक्कम काढून घेतली आहे. गेल्या वर्षीही अशीच परिस्थिती होती. या भांडवली बाहेरगमनामुळे डॉलरची टंचाई निर्माण होते आणि रुपयावर आणखी दबाव वाढतो. वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेली भूमिका काहीअंशी वास्तववादी आहे. त्यांच्या मते, रुपया कमकुवत होत आहे असे म्हणण्यापेक्षा डॉलर अधिक मजबूत होत आहे. जागतिक संकटाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था तुलनेने लवचिक राहिली आहे, हेही खरे आहे. माजी रिझर्व्ह बँक गव्हर्नर रघुराम राजन यांनीदेखील रुपयाचे मर्यादित अवमूल्यन अर्थव्यवस्थेसाठी घातक नसल्याचे सांगितले होते. परंतु ही घसरण अनियंत्रित झाली तर महागाईचा विस्फोट होऊ शकतो, ही त्यांची सूचनाही तितकीच महत्त्वाची आहे. कमकुवत रुपयामुळे भारतीय उत्पादनांची जागतिक स्पर्धात्मकता वाढू शकते. निर्यात वाढण्याची शक्यता निर्माण होते. परंतु याचा लाभ मिळवण्यासाठी देशांतर्गत उत्पादनक्षमता, निर्यात धोरण आणि उद्योगक्षेत्राला पूरक वातावरण आवश्यक आहे. अन्यथा, वाढती महागाई आणि आयात खर्च हे फायदे निष्प्रभ करू शकतात. रिझर्व्ह बँक वेळोवेळी डॉलर विकून आणि चलन बाजारात हस्तक्षेप करून रुपयावरील दबाव कमी करण्याचा प्रयत्न करते. मात्र, केवळ तात्पुरत्या उपायांनी समस्या सुटणार नाही. भारताने ऊर्जा आयातीवरील अवलंबित्व कमी करणे, निर्यात वाढवणे आणि परकीय गुंतवणूक टिकवून ठेवण्यासाठी आर्थिक स्थैर्य निर्माण करणे अत्यावश्यक आहे. आज रुपयासमोरील संकट हे केवळ चलन घसरणीचे नाही, तर जागतिक अस्थिरतेच्या काळात भारताच्या आर्थिक सहनशक्तीची परीक्षा आहे. सरकार, रिझर्व्ह बँक आणि उद्योगक्षेत्र यांनी समन्वयाने दीर्घकालीन उपाययोजना केल्यासच या दबावातून मार्ग काढता येईल.

# सावित्रीच्या लेकींचे प्रेरणादायी यश!



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ८९.. ७९ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९४ . १४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८४.१४ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे.

लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे, दुसरी पसंती लातूर तर तिसरी पसंती बारामती ही आहे. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ८९.७९ टक्के लागला. जो मागील वर्षीच्या तुलनेत २.०९ टक्क्यांनी कमी आहे.

मागील वर्षी म्हणजे २०२५ साली बारा-वीचा निकाल ९१.८८ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे.

विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न रा-हता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणा-तही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत, पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी गेल्या वर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. एआय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे.

यावर्षी जवळपास ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ४ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८६.८० टक्के इतके आहे. केवळ बारावीतच नाही तर दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. दहावीच्या परीक्षेत ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे याचाच अर्थ बारावी प्रमाणे दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे.

सावित्रीच्या लेकींची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. दहाही, बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मना-पासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# आत्मिक बळ एक जीवनमंत्र

स्वामी विवेकानंद आपल्या मित्रांशी मुक्त चर्चा करतांना म्हणाले,गुरूदेव राम कृष्णाचे चरित्र लोकांना कळाले पाहिजे. लोकांमधील संकुचित,स्वार्थी वृती नाहीशी झाल्यावर प्रत्येक संकटावर मात करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी येईल.लोकांना रामकृष्णाच्या चरित्रातुन जे आत्मिक बळ मिळेल त्यातून त्यांच्या प्रश्नाची उत्तरे त्यांना मिळतील.केवळ व्याख्याने ऐकूण काहीच होणार नाही.व्याख्यान ऐकूण लोक टाळ्या वाजवतात आणि माना डोलवतात.खूपच छान! असे म्हणून जेवणासोबत विचार पच-वून साफ करण्याचे सामर्थ्य आपल्या भारतीय बांधवात प्रचंड आहे.परीणामस्वरूप कृतिशून्य जीवन जगण्या त धन्यता मानणाऱ्या आम च्या बांधवात जोपर्यंत आध्यात्मिक विचार व विवेकवाद रुजणार नाही.तो पर्यंत केवळ व्याख्याणाने काहीच साध्य होणार नाही. हे प्रखर वास्तव मांडणारे विवेकानंद केवळ आपल्या मित्रांची वैचारीक उंची वाढवितात असे नव्हे तर समस्त युवापिढीला एक जीवनमंत्र देतात.

भारतीय माणसाच्या प्रवृतीचे अचूक वर्णन करुन त्यावर प्रहार करण्याचे काम त्यांनी खुपच मार्मिकपणे केले.गंजलेल्या लोखंडावर कितिही प्रहार केले तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही.त्याला अगोदर विस्तवात टाकुन लाल होईपर्यंत तापविले पाहिजे.त्यानंतर त्याला हवा तसा आकार देणे शक्य होते.संस्काराचेही असेच आहे.केवळ हवेत विरून जाणारे विचार मांडून काहीच उपयोग नाही.युवा शक्तीचे हृदयपरिवर्तन त्यांना खूप महत्वाचे वाटत होते.त्यामुळे सम र्पित जीवन जगणाऱ्या तरूणांच्या जीवनाला आकार देणे,त्यांना संस्कार देणे शक्य झाले की त्यांच्यात राष्ट्रभक्ती निर्माण करणे कठिण नाही.विधायक कार्यकर्त्याची मानसिकताच अपेक्षित फलप्राप्ती मिळवून देऊ शकते. त्याचे सकारात्मक परिणाम समाज, राष्ट्र आणि समस्त मानवी जीवनाला प्राप्त होतील. देशबांधवांना खरा धर्म,राष्ट्रप्रेम आणि जिवसृष्टीवरील प्रेम निर्माण करण्यासाठी मनुष्य शक्ती कार्यरत करणे हे आध्यात्माचे खरे कार्य.त्या साठी रामकृष्णाचे चरित्र लोकांना कळाले पाहिजे. आम्ही खूप सात्विकआहोत या गैरसमजातून निर्माण झालेला अंहकार आपल्या सर्वस्वाचा विनाश करतो. आपल्यातील लढाऊ वृती नष्ट करतो.आपल्यातील पतणाची जाणिव होत नाही.आत्मरिक्षणाचे महत्व समजत नाही.त्यामुळे सात्विकतेची भाषा फक्त आम च्या वाणीकक्षेत मर्यादित असते. त्यामुळे उक्ती व कृतीत महद्अंतर असते. क्षुद्र स्वार्थापायी समतोल गमावणारे बांधव अगणित दिसतात.कर्तुत्वशून्य जीवन जगून अखंड हरीनाम जपण्यात तरी काय अर्थ? सदाचारी पुतळ्यासमोर त्याच्या भगीनीवर होणारा अन्याय तो फक्त उघड्या डोळ्यानी पाहुनही प्रतिकार करण्याचे धारिष्ट गमाऊन बसला असेल, तर त्याची सात्विकता काय कामाची?षंडाच्या सात्विकतेला व सहिष्णूतेला अर्थ नसतो.

भूक शमवण्यापुरते अन्न ज्या देशात मिळत नाही,तिथे लोक धर्मपालन कसे करणार?लोकांच्या मूलभूत गरजा एकदा पूर्ण होऊ लागल्या की त्यांच्या मध्ये धर्माभिमान रूजविता येईल.शिवाय आपल्या बांधवांची म नोवृती खूप विचित्र आहे.एखादा गोरा विदेशी येऊन जरआम्हालाआमच्या धर्माविषयी सांगू लागला तर आम्ही खूप हुरळून जातो,पण आमचा एखादा फाटका सन्यासी त्याच्यापेक्षा खूप अभ्यास पूर्ण आणि अतिशय तळमळीने सांगत असेल तरी त्याचा शब्दाला आम्ही मान देतो का?अशी उदा. देऊन आपल्या गुलाम मानसिकतेवर आत्मपरिक्षण करायला ते भाग पाडत.ते अतिशय आत्मविश्वासाने एक गोष्ट सांगत.जेंव्हा माझे अनेक पाश्चात्य शिष्य त्यांच्या ज्ञानासोबत आपले आध्यात्मिक ज्ञान घेऊन भारतात येतील आणि येथील लोकांना सांगतील, तुमचा धर्म,त्यातील ज्ञान,तुमचे शिष्टाचार तुमच्या तील नितिमत्ता या सर्व बाबींना तुम्ही कमी का समजता?आम्ही तुमचा धर्म श्रैष्ठ समजतो. जेंव्हा ते असे आपल्याला सांगतील,तेंव्हा आपल्या देशातील प्रतिष्ठित,गर्भश्रीमंत लोक निमूटपणे ऐकतील आणि खरे ज्ञान ग्रहण करण्याचा सर्वसामान्याचा मार्ग खुला होईल.भगिनी निवेदिता आणि अन्य शिष्यांच्या माध्यमातून ते काम करून घेण्याची सुरूवात त्यांनी केली होती.तेआपल्या देशात येऊन आपल्या धर्माचार्याच्या जागा घेतील.अशी शंका घेण्याचे मुळीच कारण नाही याची स्वामीजी खात्री देतं.

पाश्चात्य लोक अनेक बाबतीत आपला तिरस्कार करतात,याची कबुली देऊन स्वामीजी म्हणतात, आपल्या देशात अनेक वर्षापासून सवर्णानी दलित, आदिवासी लोकावर अन्याय कैला.त्यांना अक्षरश: पायाखाली तुडविले.माणूस म्हणून जगण्याचा त्यांचा अधिकार नाकारला. त्यामुळे पाश्चात्यांना नावे ठेवण्याचा आम्हाला अधिकार आहे का?त्यांच्यापेक्षा आम्ही आमच्या बांधवावर खूप अन्याय केला आहे.आमचीजातीववर्णव्यवस्थापाश्चात्याकडून आमच्यावर होणाऱ्या अन्यायापेक्षा अधिक अन्यायी आहे.या गुलामगिरीमुळे आमच्या देशबांधवाची एक कायम स्वरूपी मानसिकता बनली आहे. त्या मानसिकतेत लाचारी इतकी घट्ट बसली आहे की भारतीय माणूस त्यामुळे आत्मभान विसरला आहे. स्वामीजी म्हणतात,गोऱ्या अधिकाऱ्याकडे नोकरी मागणारा भारतीय अर्ज लिहतो. हुजूर साहेबास विनंती की माझ्या घरी मला खायला मिळत नाही.माझी बायको व मुले भुकेने तडफडत आहेत.साहेब मी नम्र भाव-ने विनंती करतो की आपण माझी व माझ्या कुटुंबाच्या उदरभरणाची काहीतरी सोय लावून द्यावी. अन्यथा आमच्यावर भुकेने मरण्याची पाळी येईल.लेखी स्वरूपात आमच्या देशातील युवक आपली लाचारी या शब्दात कबुल करतात.या त्यांच्या विचारांचा आणि स्वाभिमानाचा काही संबध असू शकतो का?

संघटना स्थापून सभा घेणे,नोकऱ्या मागत राहणे. दुष्काळापासून वाचविण्यासाठी ओरडत राहणे. सारखा द्या..द्या..चा आमचा नारा कधी संपणार? असे सारखे मागून कीती मिळणार?भिक मागत बसण्यापेक्षा स्वातंत्र मिळवून घेण्यासाठी आक्रमक व्हा. इंग्रजांच्या राजवटीत आलेल्या सुधारणांचे स्वागतही करा.त्या धोरणामुळे आपल्याला नेमके काय मिळाले यावर चिंतन करा.जो लोकशाहीवादी विचार त्यांनी आम्हाला दिला आहे.त्यामुळे येथील समस्त मानव सुखी होणार आहे,हे नाकबूल करता येणार नाही. आपल्या जवळ त्यांना देण्यासारखे एक असिम भांडार आहे.ते म्हणजे आपले आध्यात्म. मानवतेचा उच्च आदर्श भारतातून निर्माण झाला. वेदांताचे ज्ञान मिळविण्यासाठी आणि आपल्या सना तन धर्मातील गहन आंतरज्ञान शोधण्यासाठी इंग्रज भारतात आले आहेत. तुम्ही ही अमूल्य रत्ने त्यांना द्या.स्वामीजींच्या क्रांतीकारी विचाराला सनातन्यांनी प्रखर विरोध केला.त्यांचा विचार विवेकी युवकांनी मुळीच करू नये.ज्यांनी आपल्या देशातील चातुवर्णा ची भिंत जाणिवपूर्वक जोपासली. सामाजिक विषम तेची बिजं जणिवपूर्वक जोपासले,वाढवीले.मन्मनात उच्चनिचतेची भावना निर्माण केली.पिढ्यांनपिढ्या ती जीवंत ठेवली.त्यांना इंग्रजाना नावे ठेवण्याचा अधिकार आहे का?असा खडा सवालही त्यांनी केला होता. तेंव्हा आमचा धर्म व धर्मरक्षण याविषयी आम्ही नव्याने विचार केला पाहिजे.धर्म माणसासाठी आहे. धर्मासाठी माणूस नाही.धर्मातील नितीनियम हे धर्म ज्ञान सांगणाऱ्यासाठी सोयीचे आणि इतरासाठी गैरसोयीचे करण्यावर भर सर्वत्र दिसून येतो.आपले बुद्धीचातुर्य स्वस्वार्थासाठी वापरून इतरांची गैरसोय करणारे धर्मरक्षक सर्वसामान्यांना यामुळेच आपले वाटत नाहीत.त्यामुळे धर्मांतराचे प्रमाण वाढतआहे. सर्वच धर्मांतरे जबरदस्तीने झाली नाहीत. आज धर्म रक्षकांनी आत्मपरीक्षण करून आपली भूमिका बदलणे गरजेचे आहे.अपरिवर्तणीय विचार आम्हाला मानवतावादी विचारापर्यंत नेऊ शकत नाहीत. तो मानवतावादी धर्म वेगवेगळ्या देशातील सुधारणावाद्यांनी समजून सांगितला पहीजे.जे जे या विश्वातील उदात्त आणि उत्तम आहे.ते ते आम्ही स्विकारले पाहीजे.स्वामीजींनी त्यांच्या जगभ्रमंतीचा उद्देश आपल्या विवेचनातून स्पष्ट केला. कुपमंडूक प्रवृतीने आपल्या धर्माचे खूप अधपतन केले आहे. जेवढा आमचा दृष्टीकोन उदात्त तेवढा आमचा धर्म महान.या अनुषंघाने उगवत्या पिढीने अधिक चिंतन शील होणे ही काळाची गरज आहे.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी युवकांच्या पुढाकाराची गरज



शहरात वा खेड्यात वास्तव्य करणाऱ्या बहुतेकांना कोणते ना कोणते मादक पदार्थ सेवन करण्याची सवय लागलेली आहे. त्यातच दारू, गांजा, तंबाखू, सिगारेट यांसारख्या शरीराला घातक असलेल्या पदार्थाचे सेवन अत्यंत घातक आहे. काही दिवसांपूर्वी नांदेड जिल्ह्यातील खेड्यात वास्तव्य करणाऱ्या वृद्ध व्यक्तीचा फोन आला.त्यांनी तरुण व्यक्तीविषयी एक खंत व्यक्त केली की, आजचे तरुण व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत त्यांना उद्बोधन होईल असं लेखन आपल्याकडून अपेक्षित असल्याचे सुचविण्यात आले. त्यामुळे या विषयावर लेखन करणे आवश्यक गरज बनली आहे हे मनात ठरवून लिहायला लागलो. वृद्ध व्यक्तीने मादक पदार्थ वा चाय पिण्यापेक्षा वर्तमानपत्र विकत घेऊन वाचन संस्कृती रुजवत असल्याने मला अत्यंत आनंद झाला. आज सोशल मीडियाचा युग आला असल्याने वाचन संस्कृतीपासून तरुण-तरुणी दुरावत असल्याचे चित्र दिसून येते. जुनी पिढी अजूनही ऑफलाईन दुनियेच्या वस्तुस्थितीत व व्यसनाच्या दूर राहून जीवन व्यतीत करीत असल्याचे दिसून येते.

कामगार, मजूर, शेतमजूर शारीरिक कष्ट करून सायंकाळी नशेच्या आहारी जात असल्याचे दिसून येत आहे. शारीरिक कष्ट करणारी व्यक्ती जास्तीत-जास्त दारूच्या नशेत पैशाचा अपव्यय करीत असल्याने त्यांच्या संसारावर विपरीत परिणाम होत आहे. दारू पिणाऱ्या व्यक्तीला त्याचा दुष्परिणाम लक्षात येत नसला तरी कौटुंबिक व सामाजिक परिणाम अतिप्रमाणात होत असल्याने आई-वडील, पत्नी, मुले यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे, म्हणून मादक पदार्थाचे सेवन करण्याऐवजी मुला-बाळांना तेवढ्याच पैशाचे खाऊ घेऊन गेल्यास घरी मुले खुश होतील. त्यामुळे संसारावर येणारा ताण दूर सारण्यासाठी दारूचे सेवन करणे टाळायला हवे. दारू, गांज्या यामुळे समाजजीवनावर होणारे परिणाम टाळण्यासाठी व संसार जोडण्यासाठी दारू सोडा, संसार जोडा असे सांगण्याची गरज निर्माण झाली आहे.

जीवन जगत असताना बऱ्याचदा सण, समारंभ, आनंद अशा वेळी दारूचे सेवन केले जाते. मित्राच्या सहवासात असताना एकमेकांच्या आग्रहाने आनंद व्यक्त करण्याच्या नादात एकच प्याला म्हणून घेतलेला घातक ठरत असतो. हळूहळू शरीराला त्याची सवय होत जाते. दारू, गांज्या यांसारख्या मादक पदार्था-मुळे नशा येऊन त्याचा यकृतावर परिणाम जाणवू लागतो.ही एक प्रकारची लत असून प्रथमतः आपण दारूला पीत असतो नंतर संपूर्ण शरीर अल्कोहोलिक होऊन शरीरच दारूची मागणी करीत असल्याने मादक पदार्थापासून दूर जाणे अवघड होते. तरीदेखील दारूपासून मुक्ती मिळविणे अशक्य नाही, कारण दारूचे सेवन करणे व वर्ज करणे अखेर स्वतःच्या मनावर अवलंबून असते. दारूचे सेवन करीत असल्याने दिवसभर काम केल्यावर आलेल्या पैशाचा संसारासाठी वापर न करता दारूच्या पाण्यापायी पैशाची उधळण करीत असतो. त्यामुळे कित्येक संसार उघड्यावर पडलेले असून त्यांचे कुटुंबातील सदस्य उपाशी झोपतात. असे कितीतरी कुटुंब त्यांच्या एका व्यक्तीच्या दारू पिण्यामुळे मुलं देखील वाईट व्यसनाकडे वळलेले आहेत. त्यामुळे गुन्हेगारी, चोरी, खून यांसारख्या वाईट गोष्टींकडे वळलेले आहेत. तसेच वडील दारूच्या नशेत असल्याने शिक्षण अर्धवट सोडून बालमजुरी करावी लागत असल्याचे विचित्र चित्र दिसत असल्याने दारू सोडा... संसार जोडा असं आर्जवपणे म्हणावे लागते आहे.

खेड्यात असो वा शहरात काम केल्यानंतर दिला जाणारा मोबदला देतो म्हटले तरी मजूर मिळणार नाही पण दारू द्यायला तयार झाले की, कोणतेही काम करायला तयार होणारे बघितले आहे. दारू पिण्यासाठी पैसा उपलब्ध नसला तर घरातील वस्तू विकून आपली दारूची नशा पूर्ण केली जाते. दारू पिऊन घरातील व्यक्तीला नको त्या शब्दात बोलल्या जाते. एवढेच नाही तर पत्नी, मुलांवर हात उगाळला जातो. नशेत असलेल्या व्यक्तीला भान नसल्याने होणारे नुकसानही कधीही न भरून निघणारी पोकळी आहे. एका व्यक्तीच्या सेवनाने इतरांवर होणारा अनिष्ट परिणाम हा घातक असतो. आपण ज्या ज्या परिसरात वास्तव्य करीत असतो त्या ठिकाणी अशी नानाविध व्यक्ती बघायला मिळत असते. दारूच्या नशेत व रागाच्या भरात बायको, मुलांचा खून करण्यास देखील मागे-पुढे बघत नाही त्यामुळे कुटुंबाची वाताहात निर्माण होते.

दारूच्या आहारी जाऊन स्वतःचे जीवन संपवितात. त्याचसोबत त्यांच्याशी निगडित असलेल्या नात्यांचा देखील विश्वास गमवित असतो. अखेर पिण्यासाठी पैसे नसले तर पत्नी, मुले दवाखान्यात आजारी असल्याचे सांगून इतरांकडून पैशाची मागणी करीत असतात. त्यामुळे अश्या मादक पदार्थाचे सेवन करण्याचे व्यसन न ठेवता वाचनाचे व्यसन ठेवल्यास उचित व योग्य होईल. दारूपायी अनेक कुटुंब उद्ध्वस्त होत असल्याने अनेक सामाजिक संस्था देखील व्यसनमुक्ती केंद्र उभारून त्यांच्या कुटुंबाला नवसंजीवनी देत असल्याचे दिसून येते.

चंद्रपूर जिल्ह्यातील झेप ही व्यसनमुक्ती संघटना कार्यरत आहेत. तसेच शेषराव महाराज व्यसनमुक्ती संघटना आज संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत आहेत. म्हणून आपल्या आजूबाजूच्या परिसरात दारूचे व्यसन करणाऱ्या व्यक्तीला व्यसनमुक्ती संघटनेत नेऊन सुखी संसार करण्यासाठी प्रत्येकांनी पुढाकार घ्यायला हवा.

कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो हे सर्वांना ज्ञात आहे, म्हणूनच म्हटले जाते की, अति तिथे माती ही म्हण त्याठिकाणी चपखल बसू शकते. माझ्या गावाला तसेच अवतीभवती चोवीस तास नशेच्या आहारी राहणारे व्यक्ती देखील दारूपासून दूर झालेले आहे आणि संसाररूपी रथ सुंदररित्या सांभाळत आहेत त्यामुळे त्यांना मार्ग दाखविणारे गुरू मिळाले अन्यथा त्यांची अंतिम प्रेतयात्राच निघाली असती हे सत्य आहे.म्हणून अशी स्थिती येऊ नये, तरुणपणात जग सोडून जाणे म्हणजे पत्नीला विधवा व मुलांना अनाथ करून सोडणे होय. या पृथ्वीवर जन्माला आल्यानंतर सत्कार्य करण्याचे सौभाग्य प्रत्येकाला लाभायला हवे. यासाठी दारू या विषयुक्त नशेच्या आहारी न जाता कुटुंबाच्या प्रेमात, आपुलकीत, स्नेहात राहून कुटुंब ही संकल्पना मनात रुजवायला हवी.आज कित्येक जण नशेच्या आहारी आहेत, पण यात कोणाचेही नाव लिहिणे हे उचित वाटत नाही. प्रत्येकांनी दारूचे व्यसन न करता चांगल्या कार्याचे, गोष्टीचे व्यसन करण्यास प्रोत्साहित करायला हवे. स्वतःसाठी जगता जगता इतरांसाठी जगण्याचा कानमंत्र हाती घ्यायला हवा.गावातील तरुण एकत्र येऊन व्यसनमुक्ती संघटना स्थापन करून व्यसन करणाऱ्या व्यक्तीवर अंकुश ठेवायला हवा. गावातील कुटुंब आनंदी तर गाव आनंदी आणि गाव आनंदी तर तालुका, जिल्हा, राज्य, देश आनंदी होईल आणि दारू सोडा...संसार जोडा ही संकल्पना विस्ताराला चालना मिळेल.

**-दुशांत बाबुराव निमकर**
शब्दांकुर फाऊंडेशन,
गोंडपिपरी
मो. ९७६५५४८९४९

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर त्रिकूट येथे संपन्न; शिबिरात ७४५ दाखले व ८९६ प्रमाणपत्रांचे वितरण

**नांदेड (प्रतिनिधी)**– शासनाच्या विविध लोक-कल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबीर नांदेड ग्रामीण मंडळातील त्रिकुट येथील गणपती मंदिर येथे पार पडले. या शिबिरास नागरिकांनी प्रतिसाद देत विविध योजनांची माहिती घेऊन लाभ घेतला.



या शिबिरास नांदेड दक्षिण मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर उपस्थित होते. तसेच उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, नायब तहसीलदार सुनील माचेवाड, मंडळ कृषी अधिकारी सुनिल सानप, महावितरणचे अभियंता राखे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख बाळू पाटील मोरे ब्राम्हणवाडेकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंडळातील विविध गावांचे सरपंच व इतर पदाधिकारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार आनंदराव तिडके बोंढारकर यांनी शासनाच्या विविध योजना व उपक्रम नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अशा शिबिरांची आवश्यकता असल्याचे सांगितले. या शिबिराच्या माध्यमातून महसुली कामे तत्काळ मार्गी लागत आहेत. यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत असून शासन आपल्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत महसूल, कृषी, आरोग्य, ग्रामविकास, महिला व बालकल्याण, विशेष सहाय्य योजना, भूमी अभिलेख, नोंदणी व मुद्रांक, निवडणूक विभाग तसेच आपले सरकार सेवा केंद्र, आधार केंद्र चालक यांच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार संजय वारकड यांनी केले. त्यांनी शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देत नागरिकांना योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या शिबिरामध्ये सातबारा व ८-अ चे एकूण ७४५ दाखले वितरीत करण्यात आले. तसेच उत्पन्न, रहिवासी, वय, जातीचे तसेच अल्पभूधारक प्रमाणपत्र आदी मिळून एकूण ८९६ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत ३ लाभार्थ्यांना मंजुरी प्रमाणपत्र देण्यात आले असून, १५ लाभार्थ्यांच्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात आली.

एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांना बेबी केअर किटचे वितरण करण्यात आले. तसेच सलोखा योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या गट अदलाबदलीद्वारे सातबाराचे वितरण करण्यात आले. कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत सन २०२५- २६ मध्ये ट्रॅक्टर खरेदीवर अनुदान प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मंजुरी पत्रांचे वितरण करण्यात आले.

शिबिरामध्ये विविध विभागांचे माहितीपर स्टॉल उभारण्यात आले होते. विशेषतः सातबारा व ८-अ वितरण, आधार दुरुस्ती, आपले सरकार सेवा केंद्र, जनगणनेतील स्वगणना, आरोग्य तपासणी, वन विभाग, विशेष सहाय्य योजना (संजय गांधी निराधार योजना), कृषी विभाग, महावितरण, क्रिडा विभाग, शिक्षण विभाग, आशाताई व अंगणवाडीताई, आपले सरकार सेतू केंद्र आदी स्टॉलना नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी विविध योजनांची माहिती घेऊन अर्ज व नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नायब तहसीलदार (महसूल) सुनील माचेवाड तसेच मंडळ अधिकारी अनिरुद्ध जोंधळे यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी वसंत मंगल व सचिन उपरे तसेच तालुक्यातील महसूल सेवक श्रीमती आरती सारंग व अजिंक्य सुरोशे यांनी परिश्रम घेतले.

## खा. रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकारातून नायगावात नवीन डी.पी. मंजूर

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नायगाव शहरातील राजमाता अहिल्याबाई होळकर तहसील चौक परिसरातील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून कमी दाबाचा व वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. वाढत्या वीज भारामुळे नागरिक, व्यापारी तसेच लघुउद्योग अडचणीत आले होते. अखेर या समस्येची गंभीर दखल घेत खासदार प्रा. रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या पुढाकारातून डीपीडीसी निधीतून नवीन विद्युत डी. पी. मंजूर करण्यात आला आहे. त्याचे पूजन नायगाव नगर पंचायतचे उपनगराध्यक्ष विजय चव्हाण यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.



राजमाता अहिल्याबाई होळकर तहसील चौक परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या पूजन कार्यक्रमास स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून समाधान व्यक्त केले. नवीन डी. पी. कार्यान्वित झाल्यानंतर परिसरातील कमी दाबाची समस्या मोठ्या प्रमाणात दूर होणार असून, वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यालाही आळा बसणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

यावेळी उपस्थित नागरिकांनी खासदार रविंद्र चव्हाण यांनी पाठपुरावा करून परिसरातील दीर्घकालीन वीज समस्या सोडविल्याबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच उपनगराध्यक्ष विजय चव्हाण यांनीही नागरिकांच्या समस्यांसाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवण्याचा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी नारायण पाटील जाधव, नगरसेवक शिवाजी पाटील, कल्याण, चव्हाण, पत्रकार सूर्यकांत सोनखेडकर, पत्रकार माधव चव्हाण, भालेराव मामा, गंगाधर चव्हाण, सुनिल चव्हाण यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोलचाळ येथे नळाच्या पाण्याची समस्या; माकपचे आयुक्तांना निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील खडकपुरा भागातील गोलचाळ येथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पेटला असून, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या गोलचाळ शाखेकडून मनपा आयुक्तांना सोमवार, दिनांक ११ मे रोजी निवेदन देण्यात आले.

या परिसरात मोठ्या प्रमाणात मील मजदूर, बीडी कामगार आणि रोजंदारी करून उदरनिर्वाह करणारे लोक वास्तव्यास आहेत.

पूर्वी सकाळी तीन वाजता नळाला पाणी येत असे, त्यात बदल करून सकाळी उशिरा पाणी सोडण्याचा निर्णय महापालिका पाणीपुरवठा विभागाने घेतला आहे. मोलमजुरी करणारे नागरिक मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कामावर जाण्यासाठी अडचणी येत आहेत. त्यामुळे पूर्वीप्रमाणे सकाळी ३ वाजता नळाला पाणी सोडण्यात यावे. पूर्वीप्रमाणे उच्च दाबाने पाणी पुरवठा करावा. मागील अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेली व गंजलेली पाईपलाईन बदलून नवीन पाईपलाईन टाकण्यात यावी. आदी मागण्या शाखा सचिव कॉ. मंगेश वट्टेवाड यांनी निवेदनाद्वारे आयुक्त डॉ. महेश डोईफोडे यांच्याकडे केल्या आहेत.

मागासवर्गीय व कामगार वस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या पाणीपुरवठा विभागाला वेळीच जाग आली नाही तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या गोलचाळ शाखेमार्फत तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कॉ. मंगेश वट्टेवाड यांनी दिला आहे.

## ओखा- मदुराई विशेष रेल्वे आता नियमित ओखा- तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेस म्हणून धावणार

**नांदेड (प्रतिनिधी)**– पश्चिम रेल्वेने सध्या धावणारी गाडी क्रमांक ०९५२०/०९५१९ ओखा- मदुराई- ओखा विशेष साप्ताहिक रेल्वे नियमित करण्यात आली असून, ती आता गाडी क्रमांक १९५६०/१९५५९ ओखा- तिरुपती- ओखा साप्ताहिक एक्सप्रेस म्हणून धावणार आहे.

गाडी क्रमांक १९५६० ओखा- तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेस ओखा येथून ११ मेपासून (सोमवार) नियमित धावण्यास प्रारंभ करेल. ही गाडी ओखा येथून दर सोमवारी रात्री २३.३५ वाजता सुटेल आणि द्वारका, जामनगर, राजकोट, अहमदाबाद, आनंद, वडोदरा, नंदुरबार, जळगाव, भुसावळ, अकोला, वाशिम, हिंगोली, बसमत, पूर्णा, नांदेड, बासर, निजामाबाद, काचेगुडा, गडवाल, कर्नुल सिटी, ढोणे मार्गे तिरुपती येथे बुधवारी रात्री २३.३० वाजता पोहोचेल.

## समस्येला संधी म्हणून पाहा -डॉ. शैलेश वाढेर

### 'स्वारातीम' विद्यापीठात अद्ययावत पेशी विश्लेषण विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या जैविकशास्त्र संकुल व हरियाणा गुरुग्राम येथील वॉटर्स बायो सायेन्सस यांच्या संयुक्त विद्यमाने अद्ययावत पेशी विश्लेषण या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.१० मे रोजी करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या विषयात सातत्याने अद्ययावत राहिले पाहिजे, या कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या विद्यार्थी विकासाभिमुख भूमिकेतून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी डॉ. शैलेश वाढेर हे होते. तसेच तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून अंकिता परब आणि मोहम्मद यांनी मार्गदर्शन केले.

अंकिता परब यांनी फ्लो सायटोमेट्री या तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती देताना कर्करोग निदान, अन्न व हवा प्रदूषण तपासणी, मूल पेशी शोध, पेशी विभाजन अवस्था, पेशी विकास, पेशी चक्रातील बदल, गुणसूत्रांची संख्या, नियत पेशी मृत्यू, औषध शोध आदी क्षेत्रांतील त्याच्या उपयोगांवर प्रकाश टाकला.

यावेळी व्यासपीठावर डॉ. बी. एस. सुरवसे, डॉ. लक्ष्मीकांत कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांनी समस्येला समस्या न समजता संधी म्हणून पाहा, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. प्रास्ताविक डॉ. बी. एस. सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन रुबिया शेख यांनी तर आभार डॉ. उमेश धुलधज यांनी मानले.

या कार्यशाळेस डॉ. परशुराम पवार व डॉ. नागेश ढोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक डॉ. बी. एस. सुरवसे, सहसंयोजक डॉ. सुनील हजारे, आयोजन सचिव डॉ. उमेश धुलधज, डॉ. ए. पी. पाठक, डॉ. हेमलता भोसले, डॉ. मिलिंद गायकवाड, गोविंद सूर्यवंशी, प्रतिभा ढवळे, समरीन पठाण, विद्या सुकरे, डॉ. चव्हाण, वसुधा कोडगिरे, राजू शेरे, सय्यद खाजा व सुशील खरवडकर यांनी परिश्रम घेतले.

## वडिलांचे छत्र हरवलेल्या श्रेया भांडेचे दहावी परीक्षेत यश

**नांदेड (प्रतिनिधी)**– वडिलांचे छत्र हरवल्याने आईचा आधार बनत व धीर देत कठोर अभ्यास केला. या अभ्यासाचे फलित म्हणून गोदावरी प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेतून श्रेया भांडे हिने चौथा क्रमांक मिळवत दहावीमध्ये ९३. ६० टक्के गुण मिळविले.



अगदी लहानपणापासून अभ्यासाची गोडी असलेल्या श्रेया हिने शहरातील टायनी, वेलिंग्टन या शाळेमधून शिक्षणाचे धडे घेतले. इयत्ता सातवीमध्ये स्कॉलरशिप परीक्षा दिली. यात तिला फारसे यश आले नाही. तरी तिने अभ्यासाकडे दुर्लक्ष केले नाही. यातून तिचे ज्ञान वाढत गेले. आठवी ते दहावीचे शिक्षण ती सध्या गोदावरी प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेत घेते.

## नॅशनल धोबी महासंघाच्या सोशल मीडिया प्रदेशाध्यक्षपदी संतोष औंढेकर

**नांदेड (प्रतिनिधी)** –नॅशनल धोबी महासंघाच्या सोशल मीडिया प्रदेशाध्यक्षपदी नांदेड येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष औंढेकर यांची निवड करण्यात आली आहे. नॅशनल धोबी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्राचार्य अनिल मोरे यांनी निवडीचे पत्र औंढेकर यांना नुकतेच पाठविले आहे.



संतोष औंढेकर यांनी यापूर्वी जिल्हाध्यक्ष व मराठवाडा अध्यक्ष असताना धोबी समाजासाठी उत्कृष्ट कार्य केल्यामुळेच त्यांची ही निवड करण्यात आली आहे. संतोष औंढेकर यांची निवड झाल्याबद्दल धोबी समाज बांधवांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## के. रामलू शाळेची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)**– कुंडलवाडी येथील के. रामलू पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे. या शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

कुंडलवाडी येथील के. रामलू पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी वर्ष २०२५-२६ च्या महाराष्ट्र एसएससी बोर्ड परीक्षेत १०० टक्के प्राप्त करून निकालाची परंपरा कायम राखली आहे. प्रथम आलेले विद्यार्थी श्रीराम राजेश्वर इंदूरकर व विवेक मुकेशकुमार जोशी या दोघांनाही सारखेच गुण म्हणजे ९४.४० टक्के मिळाले तर द्वितीय आलेल्या महिमा हरीश देशपांडेला ९१.८० टक्के तर नरेश सायन्ना अटनमवार याला ९१.४० टक्के गुण मिळाले आहेत. शाळेच्या ५८ विद्यार्थ्यांनी यावर्षी दहावीची परीक्षा दिली होती. यापैकी सर्व ५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात ९० टक्केपेक्षा जास्त ४ विद्यार्थी, ८० टक्केपेक्षा जास्त २२ विद्यार्थी, ७० टक्केपेक्षा जास्त २१ विद्यार्थी असे गुण मिळवले आहेत. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी राबवलेल्या कॉपीमुक्त अभियानात देखील या शाळेने आपली ८ वर्षे सतत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

तालुक्यातील शाळांमध्ये उत्कृष्ट कामगिरीची परंपरा के. रामलू पब्लिक स्कूलने कायम राखली असून, त्यासाठी संस्थेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सर्वांचेच योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका सौ. रमा ठक्कुरवार प्रिंसिपल एस. जाधव, व्हाईस प्रिंसिपल एम. सपना यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी संस्था कटिबद्ध राहील.

के. रामलू पब्लिक स्कूल भविष्यातही अशाच पद्धतीने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी संस्था कटिबद्ध असणार आहे, असे प्रिंसिपल एस. जाधव यांनी सांगितले.

## बिलोली-सगरोळी व देगलूर-नांदेड-सगरोळी विस्कळीत बससेवा नियमित करण्याची मागणी

**बिलोली (प्रतिनिधी)**– सगरोळी परिसरासह बिलोली व देगलूर तालुक्यातील प्रवाशांची मोठी गैरसोय लक्षात घेऊन बिलोली – सगरोळी मार्गे देगलूर तसेच नांदेड ते सगरोळी रात्री सगरोळी मुक्कामी असणारी बंद झालेली बससेवा नियमित करावी, या मागणीचे निवेदन परिसरातील नागरिकांनी ग्रामपंचायत ठरावाच्या माध्यमातून बिलोली परिवहन महामंडळ आगार प्रमुखांकडे केली आहे.

तेलंगणा व कर्नाटक राज्य सीमा भागातील बिलोली व देगलूर या दोन्ही तालुक्यातील नागरिकांना दैनंदिन कामकाजासोबतच विविध शासकीय कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी नियमित ये-जा करावी लागते. तसेच शेजारील तेलंगना व कर्नाटक राज्यात या भागातील नागरिकांच्या रोटी बेटीच्या नात्यागोत्यांचे मोठ्या प्रमाणात ऋणानुबंध असल्यामुळे या सीमा भागातून ये-जा करणाऱ्या प्रवाशांची सततची वर्दळ पाहाता या भागातून महामंडळाला अधिकचे आर्थिक उत्पन्न मिळते. तेलंगना राज्याच्या बसेस बोधन ते सगरोळी मार्गे देगलूरकडे मोठ्या प्रमाणात धावताना दिसतात. तसेच या महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवैध प्रवासी वाहनचालक बेभाव प्रवासी भाडे वसूल करून प्रवाशांची आर्थिक लूट करतात. परंतु रा. परिवहन महामंडळाच्या बसेस या ६३ क्रमांकाच्याच राष्ट्रीय महामार्गावरून अचानक गायब का? असा सवाल प्रवाशी उपस्थित करीत आहेत. तर वयोवृध्द प्रवाशांना शासनाच्या मोफत प्रवास, दिव्यांग व महिलांच्या पन्नास टक्के सवलतीचा उपयोग तरी काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

सगरोळी हे मोठ्या वस्तीचे गाव असून, येथे मोठी व्यापारपेठ आहे. तसेच सगरोळी व खतगाव येथे मोठे शैक्षणिक संकुल असून येथे ये-जा करणाऱ्या हजारो शालेय विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. या भागातील प्रवाशांची व शालेय विद्यार्थ्यांची एकंदरीत समस्या लक्षात घेऊन खतगाव, केसराळी, रामपूर थडी, हिप्परगा थडी, शिंपाळा यासह अन्य गावातील नागरिकांनी ग्रामपंचायत ठरावाच्या माध्यमातून बिलोली ते सगरोळी – खतगाव- मार्गे देगलूर बस कायमस्वरुपी चालू करावी. नांदेड ते सगरोळी ही बस पूर्वी रात्रीला सगरोळी मुक्कामी थांबणारी बस खतगाव मार्गे नांदेड नियमित करावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

## बँकिंग, फायनान्स, अॅग्रीकल्चर, शिक्षण क्षेत्रात रोजगाराची संधी

### पंडित दीनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व स्वा. सै. राजासिंग हरिसिंग चव्हाण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुखेड यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. १२ मे २०२६ रोजी सकाळी १० वा.पासून स्वा. सै. राजासिंग हरिसिंग चव्हाण शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुखेड येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्ह/ रोजगार मेळाव्यामध्ये नामांकित उद्योजकांच्यावतीने मुलाखती घेण्यात येणार असून, या रोजगार मेळावा/ प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये एसबीआय लाईफ इन्शुरन्स, मुथ्थुट फायनान्स लि. मेघदूत डेअरी प्रोडक्टस, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल मुखेड या आस्थापनेकडून रिक्तपदे प्राप्त झाली असून ते प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. त्यासाठी कोणत्याही शाखेची पदवी, डिप्लोमा, आयटीआय, एचएससी उत्तीर्ण इत्यादी पात्रताधारक युवक-युवतींसाठी शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या www. rojgar.mahaswayam. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजर आयडी व पासवर्डने लॉगीन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे किंवा पात्रतेनुसार बायोडाटाच्या आवश्यक प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदासाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास या कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक ०२४६२-२५१६७४ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

संबंधित दिनांकास सकाळी १० वा. कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून पात्रतेप्रमाणे विविध नियोक्त्याकडे मुलाखती देवून रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

## खा. रामराव वडकुते यांची माजी जि.प. सदस्य गंगाप्रसाद काकडे यांच्या निवासस्थानी भेट



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– भाजपाचे राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

भाजपाचे राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांनी १० मे रोजी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे यांच्या कौठा नांदेड येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी माजी जि. प. सदस्य गंगाप्रसाद काकडे, निरंजन काकडे, देवराव काकडे यांच्यासह एकनाथ धमणे, रवी भोकरे, गणेश काकडे, विनोद काकडे यांनी शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी समाजातील प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## पंक्चरवाल्याने दोन्ही मुलींना बनविले पोलीस कॉन्स्टेबल

### पेनूर येथील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मुलीची यशोगाथा

**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा तालुक्यातील मौजे पेनूर येथील केवळ १ एकर शेती असणाऱ्या व सायकलचे पंक्चर काढून आपली उपजीविका भागविणाऱ्या विठोबा गवते यांच्या दोन्ही मुलींची नागपूर पोलीस दलात पोलीस म्हणून निवड झाली आहे.



लोहा तालुक्यातील मौजे पेनूर येथील केवळ १ एकर शेती असलेले अल्पभूधारक शेतकरी विठोबा गवते यांना दोन मुली व एक मुलगा आहे. घरची परिस्थिती बेताची असतानाही त्यांनी आपल्या दोन मुली व एका मुलांना चांगले शिकविले. काबाडकष्ट करून आपल्या पाल्यांना शिक्षणासाठी त्यांनी नेहमी पाठींबा दिला.

वडील हे काबाडकष्ट करून आपल्याला शिक्षण शिकवीत आहेत. त्यांच्या मेहनतीचे चीज झाले पाहिजे हा उदात्त हेतू मनी ठेवून त्यांच्या दोन्ही मुलींनी जिद्द, परिश्रमाच्या जोरावर व अभ्यासात सातत्य ठेवून त्यांची मोठी मुलगी कु. ज्योती विठोबा गवते हिने पोलीस भरतीची तयारी करून २०२२ मध्ये नागपूर पोलीस दलात भरती झाली व मोठ्या बहिणीच्या पावलावर पाऊल ठेवत छोटी बहीण कु.स्वाती विठोबा गवते हीची सुध्दा २०२६ मध्ये नागपूर पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून निवड झाली.

**पेनूरच्या ग्रामस्थांकडून सत्कार**

'बेटी पढाव, बेटी बचाव' या घोषवाक्याप्रमाणे पेनूर येथील अल्पभूधारक शेतकरी विठोबा गवते यांनी मुलगा-मुलगी असा भेदभाव न करता आपल्या दोन्ही मुलींना चांगले शिक्षण शिकवून त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहुन दोन्ही मुलींना पोलीस दलात भरती होण्यास सिंहांचा वाटा उचलला. यामुळे पेनूर येथील सामाजिक कार्यकर्ते मारोती एजगे, विरभद्र एजगे, गिरीष एजगे या बंधूंच्या पुढाकारातून गावचे बाबाराव पाटील गवते, गंगाधर पाटील गवते, बाळू पाटील गवते, राम पाटील गवते, चंद्रकांत पाटील गवते, विजय सूर्यवंशी व सर्व गावकऱ्यांनी महिला पोलीस कॉन्स्टेबल कु.ज्योती विठोबा गवते व पोलीस कॉन्सटेबल कु. स्वाती विठोबा गवते यांचा सत्कार केला.

# चंदेरी


## तब्बूने दिला होता ‘राजा शिवाजी’ चित्रपटाला नकार!



अभिनेता रितेश देशमुखचा ‘राजा शिवाजी’ चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत असून गेल्या ८ दिवसांत चित्रपटाने चांगली कमाई केली आहे. रितेश देशमुख दिग्दर्शित व जिनिलीया देशमुख निर्मित या ऐतिहासिक चित्रपटात मराठीसह हिंदीतीलही अनेक बडे कलाकार आहेत. अभिषेक बच्चन, संजय दत्त, विद्या बालन यांसारखे अनेक बॉलीवूड कलाकार या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकत आहेत. महेश मांजरेकर, जीतेंद्र जोशी यांसारखे लोकप्रिय मराठी कलाकारसुद्धा आहेत. पण, तुम्हाला माहीत आहे का ‘राजा शिवाजी’मध्ये विद्या बालनने साकारलेल्या भूमिकेसाठी तिला पहिली पसंती नव्हती. तिच्या जागी बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रीला पहिली पसंती होती. ‘राजा शिवाजी’ या चित्रपटात विद्या बालनने मोठ्या बेगमची भूमिका साकारली आहे. पण आधी हा रोल बॉलिवूड अभिनेत्री तब्बूला ऑफर करण्यात आला होता. तारखा जुळत नसल्यामुळे तब्बूने हा रोल नाकारला. त्यानंतर रितेशने विद्या बालनशी संपर्क साधला आणि ती लगेच या प्रोजेक्टमध्ये सहभागी झाली. आता विद्या बालनच्या अभिनयाचं खूप कौतुक होत आहे.

## अमिताभ बच्चन यांनी का सोडले होते राजकारण?

**दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार थलपती विजय राजकारणातील हुकुमी एक्का ठरला आहे. नुकताच राजकारणात आलेला विजय आता मुख्यमंत्री पदाकडे वाटचाल करतो आहे. त्याच्या पार्टीने मिळवलेले यश आणि त्याची लोकप्रियता केवळ तमिळनाडूपुरती मर्यादित नसून देशभरात चर्चेचा विषय ठरली आहे. मात्र, असाही एक काळ होता जेव्हा बिग बी अमिताभ बच्चन यांनी अफाट लोकप्रियतेवर राजकारणाचे मैदान मारले होते. मात्र, त्यांचा हा प्रवास अत्यल्प ठरला अन् ते पुन्हा सिनेविश्वाकडे वळाले.**



अमिताभ बच्चन यांनी अनेक दशके सिनेविश्वावर राज्य केले. त्यांची लोकप्रियता अफाट झाली होती. त्यांचा प्रत्येक चित्रपट चित्रपटगृहात धुमाकूळ घालत होता. मात्र, १९८३ मधील ‘कुली’ या चित्रपटाच्या सेटवर त्यांचा अपघात झाला आणि चाहत्यांना मोठा धक्का बसला. अमिताभ यांच्यासाठी संपूर्ण देश प्रार्थना करू लागला. रुग्णालयात बच्चन आपल्या जीवन-मरणाची झुंज देत असताना देशभरातील चाहत्यांनी त्यांच्यासाठी नवस बोलण्यास आणि प्रार्थना करण्यास सुरुवात केली. महिनाभरानंतर अमिताभ रुग्णालयातून बाहेर आले आणि चाहत्यांचा जीव भांड्यात पडला. आपला अभिनेता ही लढाई यशस्वीरित्या पूर्ण करून पुन्हा सज्ज झाला, अशी भावना चाहत्यांमध्ये निर्माण झाली. मुंबईच्या रस्त्यांवर त्यांची एक झलक पाहण्यासाठी लोकांचा जनसमुदाय लोटला होता, यावरून अमिताभ यांच्या लोकप्रियतेला कोणीही धक्का लावू शकत नाही हे सिद्ध झाले. मात्र, याच दरम्यान इंदिरा गांधी यांची हत्या झाली आणि राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाचा भार स्वीकारला. बच्चन यांच्या लोकप्रियतेमुळे बालमित्र राजीव गांधी यांनी मदतीची हाक दिली आणि अमिताभ यांची पाऊले राजकारणाकडे वळाली. अमिताभ बच्चन यांनी उत्तर प्रदेशमध्ये आपली जादू दाखवली आणि लोकप्रियतेच्या जोरावर अलाहाबाद (प्रयागराज) लोकसभा मतदारसंघातून विजयश्री खेचून आणली. राजकारणात नव्याने पाऊल ठेवलेल्या अमिताभ यांच्यासाठी हा विजय स्वप्नवत होता. मात्र, त्यांच्या या स्वप्नाला लवकरच ग्रहण लागले आणि याचे कारण ठरले पक्षांतर्गत गटबाजी आणि राजकारण. अमिताभ यांच्या लोकप्रियतेमुळे काही नेत्यांचे धाबे दणाणले. त्यांना अमिताभ यांची घोडदौड खटकू लागली आणि अमिताभ बच्चन यांच्याविरोधात राजकीय डाव सुरू झाले. अलाहाबादमध्ये अमिताभ बच्चन यांचे ‘हरवले आहेत’ पोस्टर्स लागू लागले. चित्रपटांमधून वेळ काढून ते दोन आठवडे जरी मदारसंघामध्ये दिसले नाही तरी काही नेते संपूर्ण शहरभर बच्चन यांचा चेहरा असलेले ‘हरवल्याचे’ पोस्टर्स लावत असत. वीर संघवी यांच्या ‘अ रूड लाईफ’ या आत्मचरित्रात नमूद केल्यानुसार, तत्कालीन अर्थमंत्री व्ही. पी. सिंह हे बच्चन यांच्या अलाहाबादमधील अति लोकप्रियतेमुळे अस्वस्थ होते. हा त्यांचा बालेकिल्ला असल्याचा त्यांचा समज होता. संघवी यांनी असेही लिहिले आहे की, पक्षातील ज्येष्ठ सदस्यांनी शहरावरील बच्चन यांची पकड कमकुवत करण्यासाठी एकामागून एक असे अनेक राजकीय डावपेच रचले होते. १९८७ मध्ये बच्चन हे ‘बोफोर्स घोटाळ्या’त अडकले आणि त्यांना मोठा राजकीय धक्का बसला. याचे पुरावे नसले तरी विरोधकांनी याचे भांडवल केले. वाढत्या टीकेमुळे आणि दबावामुळे अमिताभ बच्चन यांनी लोकसभा खासदारकीचा राजीनामा दिला आणि त्यांच्या राजकीय प्रवासाला ब्रेक लागला. नंतर ते या आरोपातून निर्दोष सुटले असले तरी अमिताभ बच्चन पुन्हा राजकारणाच्या वाट्याला गेले नाहीत.

## त्रिशा कृष्णनला व्हायचं होतं क्रिमिनल सायकॉलॉजिस्ट, किती आहे शिक्षण?

**तमिळ आणि तेलुगू चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री त्रिशा कृष्णन सध्या चर्चेत आहे. त्यामागचं कारण म्हणजे तिची आणि विजय थलपती यांची मैत्री. अभिनेत्री यापूर्वीसुद्धा तिच्या व्यावसायिक आणि खासगी आयुष्यामुळे चर्चेत आलेली आहे. पण, असं असूनही तिच्याबद्दलच्या अशा काही गोष्टी आहेत ज्या अनेकांना माहीत नाहीये. यापैकी एक म्हणजे खऱ्या आयुष्यात त्रिशा उच्चशिक्षित असून तिच्याकडे अनेक पदव्या आहेत.**



त्रिशाची वेगळी ओळख करून देण्याची गरज नाही. तिचा जन्म ४ मे १९८३ रोजी तमिळनाडूतील चेन्नई येथे झाला. तिने सुरुवातीचं शिक्षण सेक्रेड हार्ट मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये घेतलं. त्यानंतर तिने चेन्नईतील इथिराज कॉलेज फॉर वुमनमधून बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये पदवी प्राप्त केली. मात्र, तिला क्रिमिनल सायकॉलॉजिस्ट बनायचं होतं, पण चित्रपटांमध्ये संधी मिळाल्यामुळे तिने पुढचं शिक्षण सोडलं. कॉलेजच्या काळातच तिने मॉडेलिंगला सुरुवात केली. मॉडेलिंग करत असताना त्रिशाला चित्रपटांच्या ऑफर्स मिळू लागल्या. तिने १९९९ साली छोट्या भूमिकेतून तमिळ चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. त्यानंतर हळूहळू तिने तमिळ आणि तेलुगू इंडस्ट्रीमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. तिने अनेक लोकप्रिय अभिनेत्यांसह अनेक हिट चित्रपटांत महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या. यासह तिने हिंदीतही काम केलं आहे. त्रिशा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असते. २०१५ साली तिचा उद्योजक वरुण मनियनबरोबर साखरपुडा झाला होता, पण नंतर त्यांचं नातं तुटलं. या नात्याबद्दल त्रिशाने सांगितलं होतं की, तिला अभिनय सोडण्याची अट घातली गेली होती, त्यामुळेच तिने साखरपुडा मोडण्याचा निर्णय घेतला.

## ऋषी कपूर यांच्या लेकीचे 45 व्या वर्षी बॉलीवूडमध्ये पदार्पण



**ऋषी कपूर यांची मुलगी रिद्धिमा कपूर वयाच्या ४५ व्या वर्षी ‘दादी की शादी’ या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये दमदार पदार्पण करणार आहे. वडिलांच्या विरोधामध्ये चंदेरी दुनियेपासून लांब राहिलेली रिद्धिमा आपल्या मुलीसह पदार्पण करणार आहे. वय हा फक्त आकडा असून स्वप्ने पूर्ण करण्यासाठी त्याचे बंधन नसते हे तिने सिद्ध केले.**

बॉलीवूडमधील अभिनयाचा वारसा जपणारे कुटुंब म्हणून कपूर घराणे मानले जाते. सिनेविश्वात कपूर कुटुंबाच्या चार पिढ्या प्रभावशाली आणि यशस्वी करिअर घडवत आहेत. पृथ्वीराज कपूर यांच्यापासून सुरू झालेला हा प्रवास राज कपूर, शम्मी कपूर व शशी कपूर यांनी यशस्वीरीत्या सांभाळला. त्यानंतर रणधीर, राजीव व ऋषी कपूर यांनी प्रेक्षकांची मने जिंकली, तर करिश्मा कपूर, करीना कपूर व रणबीर कपूर यांनी तर बॉलीवूडचा काळ गाजवला आणि आजही त्यांची जादू कायम आहे. नुकतीच कपूर घराण्यात सामील झालेली आलिया भट्ट यशाच्या शिखरावर आहे. अशातच आता आणखी एक कपूर बॉलीवूडमध्ये दमदार पदार्पण करणार आहे आणि ती म्हणजे रिद्धिमा कपूर. वयाच्या ४५ व्या वर्षी ऋषी कपूर आणि नीतू कपूर यांची कन्या रिद्धिमा बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. टीव्ही आणि ओटीटी शोमध्ये सामील झाल्यामुळे चर्चेत आलेली रिद्धिमा आता सिनेविश्व गाजवण्यास सज्ज झाली आहे. ‘दादी की शादी’ या चित्रपटातून रिद्धिमा पदार्पण करणार आहे. वडिलांच्या विरोधामुळे चंदेरी दुनियेपासून दूर राहिलेली रिद्धिमा आता दमदार पदार्पण करणार आहे. रिद्धिमासह तिची मुलगी समारादेखील पहिल्यांदाच पडद्यावर झळकणार असल्याने या चित्रपटाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अनेकदा स्त्री कलाकार लग्नानंतर अभिनयाचे क्षेत्र सोडून कुटुंबाला प्राधान्य देत करिअर सोडून देतात. मात्र, रिद्धिमाने चाळिशीनंतर चित्रपटांमध्ये काम करण्याचा निर्णय घेतला. रिद्धिमा ही कपूर घराण्यातील बॉलीवूडमध्ये सर्वांत उशिरा पदार्पण करणारी अभिनेत्री ठरणार आहे. कपूर घराण्यातील असूनही तिने चित्रपटांमध्ये काम का केले नाही याचे कारण ऋषी कपूर यांच्या ‘खुल्लम खुल्ला’ या पुस्तकात सांगितले आहे. नीतू कपूर यांनी लिहिले आहे की, रिद्धिमाला माहीत होतं की तिने अभिनेत्री व्हायचं ठरवलं तर तिचे वडील आत्महत्या करतील. ऋषी कपूर आपल्या पत्नी आणि मुलीबद्दल प्रचंड ओव्हर प्रोटेक्टिव्ह होते. रिद्धिमामध्ये उत्तम अभिनय कौशल्य आणि सौंदर्याची खाण असूनही केवळ वडिलांच्या नाराजीपोटी ती ज्वेलरी आणि फॅशन डिझायनिंगकडे वळाली, असे नीतू कपूर यांनी लिहिले आहे. रिद्धिमाने आता म्हटले आहे, की हे खरोखरच एखाद्या स्वप्नासारखे वाटत आहे. सर्व काही पुन्हा मूळ पदावर येऊन एक वर्तुळ पूर्ण झाल्यासारखे वाटत आहे. मला खात्री आहे की, माझे वडील (ऋषी कपूर) सदैव माझ्या पाठीशी आहेत. मी हाती घेतलेल्या प्रत्येक कामात त्यांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी कायम असतात. याच विचारातूनच मला प्रेरणा मिळते. आयुष्याच्या या टप्प्यावर एका पूर्णपणे नवीन विश्वात पाऊल टाकणे, हे माझ्यासमोर सर्वांत मोठे आव्हान होते. कोणतीही नवी सुरुवात करण्यात एक प्रकारची असुरक्षितता असते; पण त्याच वेळी त्याबद्दल प्रचंड उत्साहही वाटत असतो, अशा भावना व्यक्त केल्या. ‘दादी की शादी’ हा हिंदी कौटुंबिक विनोदी चित्रपट शुक्रवारी (८ मे) प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात विधवा आजीच्या पुनर्विवाहाची कथा रंगवण्यात आली आहे.

## त्रिशालाला केवळ या कारणासाठी यायचं होतं बॉलीवूडमध्ये... पण...



बॉलीवूडचा ‘खलनायक’ संजय दत्त याची थोरली मुलगी त्रिशाला दत्त फिल्म इंडस्ट्रीपासून दूर आहे. ग्लॅमरस जगापासून लांब असलेल्या त्रिशालाने नुकताच तिच्या करिअर निवडीबाबत एक खुलासा केला. तिने सांगितलं की, लहानपणी तिला अभिनेत्री बनायची इच्छा होती, मात्र ती अभिनयाच्या आवडीमुळे नाही तर केवळ वडील संजय दत्त यांच्या जवळ राहता यावे यासाठी होती. आई रिचा शर्मा यांच्या निधनानंतर परदेशात वाढलेल्या त्रिशालाला वडिलांच्या प्रेमाची ओढ होती. आज त्रिशाला मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात स्वतःचे वेगळे नाव कमावत आहे. १९८८ मध्ये जन्मलेली त्रिशाला ही संजय दत्त आणि त्याची पहिली पत्नी रिचा शर्मा यांची मुलगी आहे. १९९६ मध्ये रिचा यांच्या निधनानंतर त्रिशाला अमेरिकेत तिच्या आजी-आजोबांकडे लहानाची मोठी झाली. ‘इन्साईड थॉट्स आऊट लाउड’ या पॉडकास्टमध्ये तिला विचारण्यात आलं की, तुला कधी बॉलीवूडमध्ये काम करावं वाटलं का? त्यावर ती म्हणाली, की लहान असताना मी याबद्दल विचार केला होता. पण मला अभिनेत्री बनायचं होतं. कारण मला अभिनय आवडत होता, असं नाही तर मला फक्त माझ्या वडिलांच्या जवळ राहायचं होतं. वडिलांनी आयुष्यात खूप चढ-उतार पाहिले आहेत. त्यांनी मला विचारलं, ही खरंच तुझी आवड आहे का? तुला मनापासून या क्षेत्रात यावं वाटतं का? मी त्यांना सांगितलं की, मला फक्त तुमच्याबरोबर जास्त वेळ घालवायचा आहे. त्यावर ते म्हणाले, ‘तुला नेमकी कशाची आवड आहे, त्याबद्दल आपण बोलू आणि त्या क्षेत्रात तू पुढे जा. तू अमुक एका व्यक्तीची मुलगी आहेस म्हणून तू थेट ए-लिस्ट अभिनेत्री बनशील किंवा तुला खूप ऑफर्स येतील, असं अजिबात नाही. त्रिशालाची आई रिचा शर्मा यांचे १९९६ मध्ये ब्रेन कॅन्सरमुळे निधन झालं होतं. त्यानंतर संजय दत्तने १९९८ मध्ये रिया पिल्लई यांच्याशी लग्न केलं, पण २००८ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. २००८ पासून तो मान्यता दत्तबरोबर आहे. २०१० मध्ये त्यांना शाहरान आणि इक्रा ही जुळी मुलं झाली.

## माधुरी दीक्षितच्या नवऱ्याने का सोडली अमेरिकेतील नोकरी?

**अभिनेत्री माधुरी दीक्षितने १९९९ मध्ये डॉ. श्रीराम नेनेंशी लग्न केलं. या दोघांचा विवाहसोहळा अमेरिकेत मराठमोळ्या पद्धतीत पार पडला होता. खरंतर, नेनेंचा जन्म लंडनमध्ये झाला आणि त्यानंतर ते आपल्या कुटुंबासह अमेरिकेत राहायला आले. याचठिकाणी त्यांनी आपलं वैद्यकीय शिक्षण सुद्धा पूर्ण केलं. लग्नानंतर माधुरी देखील अमेरिकेत शिफ्ट झाली. अनेक वर्षे अमेरिकेत राहिल्यावर या जोडप्याने २०११ मध्ये कायमस्वरुपी भारतात परतण्याचा निर्णय घेतला.**



डॉ. श्रीराम नेनेंनी अमेरिकेतील हार्ट सर्जनची नोकरी सोडून भारतात येण्याचं ठरवलं, तेव्हा त्यांचे आई-बाबा सुरुवातीला प्रचंड नाराज झाले होते. डॉ. श्रीराम नेने सांगतात, की माझ्या आई-बाबांनी मला सुरुवातीलाच सांगितलं होतं की, तू एकतर डॉक्टर हो किंवा इंजिनिअर हो, अन्यथा आम्ही तुझ्या शिक्षणासाठी खर्च करणार नाही. माझे आई-बाबा आधीच्या पिढीतील असल्याने साहजिकच त्यांची विचारसरणी त्यावेळी थोडी वेगळी होती. त्यानंतर मी वॉशिंग्टन विद्यापीठात अंडरग्रॅज्युएट मेडिसिन प्रोग्राममध्ये प्रवेश घेतला. त्याठिकाणी शिक्षण पूर्ण करून युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियामध्ये प्रवेश घेतला. तिथे मी माझं जनरल आणि व्हॅस्क्युलर सर्जरीचं शिक्षण पूर्ण केलं. पुढे, मग फ्लोरिडा विद्यापीठात मी प्रॅक्टिस सुरू केली. यानंतर डॉ. श्रीराम नेनेंनी अमेरिकेत अनेक वर्षे काम केलं. मात्र, काही वर्षांनी त्यांनी हार्ट सर्जनची नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. परदेशातील नोकरी सोडून त्यांनी वैद्यकीय सल्लागार व उद्योजक म्हणून काम करण्यास सुरुवात केली, ते २०११ मध्ये भारतात आले. हा निर्णय त्यांच्या आई-वडिलांना म्हणजेच माधुरीच्या सासू-सासऱ्यांना पटला नव्हता. यावर नेने सांगतात, की हार्ट सर्जनची नोकरी सोडणं. हा खूप मोठा निर्णय होता. कित्येकांचं हे स्वप्न असतं, त्यामुळे या निर्णयावर तेव्हा माझे आई-वडील नक्कीच खूश नव्हते. पण, हळूहळू मी आता जे-जे काही करतोय, वैद्यकीय क्षेत्रात सल्लागार म्हणून काम करतोय हे सगळं पाहून त्यांना आता हा निर्णय पटलेला आहे. असंख्य लोकांसाठी सल्लागार म्हणून काम करणं हे माझं स्वप्न होतं म्हणून मी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. पारंपरिक आरोग्य सेवा महत्त्वाच्या असतात पण, त्याच्या जोडीने आपण तंत्रज्ञानाच्या साथीने लोकांना घरबसल्या देखील अनेक माहिती पुरवू शकतो असा विचार माझ्या मनात आला. मग युट्यूब चॅनेल सुद्धा सुरू केलं, असे ते म्हणाले. डॉ. नेनेंचं स्वतःचं युट्यूब चॅनेल सुद्धा आहे. यावर ते अनेक हेल्दी रेसिपीजचे व्हिडीओ बनवून शेअर करत असतात.

## अरबाज खानने 6.5 कोटींत विकला जुना फ्लॅट!

सलमान खानचा भाऊ अरबाज सलीम खानने लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील रनवाल एलिगंट प्रकल्पातील आपला १,३६९ चौरस फुटांचा फ्लॅट विकला आहे. सीआरई मॅट्रिक्सकडून मिळालेल्या मालमत्ता नोंदणीच्या कागदपत्रांनुसार, अरबाजने मुंबईतील अंधेरी पश्चिम येथील या फ्लॅटचा सौदा ६.५ कोटी रुपयांत केला. या व्यवहाराची नोंदणी मंगळवारी (५ मे) झाली. कागदपत्रांनुसार, हा फ्लॅट रनवाल एलिगंट प्रकल्पाच्या टॉवर बीमध्ये आहे. या फ्लॅटसाठी दोन गाड्यांसाठी पार्किंगची जागा आहे. खरेदीदारांनी या व्यवहारासाठी ३९ लाख रुपयांचे मुद्रांक शुल्क भरले आहे. रनवाल एलिगंट प्रकल्प इन्फिनिटी मॉलजवळ आहे. अरबाज खानने अद्याप या प्रकरणी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. अरबाज खान मुंबईत आपल्या रिअल इस्टेट मालमत्तांचा विस्तार करत आहे. त्याची पत्नी, शूरा खानदेखील त्याला यात पूर्ण पाठिंबा देते. एका अहवालानुसार, अरबाज खानची एकूण संपत्ती ५०० कोटी रुपये असून, चित्रपट निर्मिती हा त्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. अरबाजने अभिनेता म्हणून फारशा चित्रपटांमध्ये काम केलेले नाही, परंतु तो चित्रपट निर्मिती आणि व्यवसायातून भरीव उत्पन्न मिळवतो.

## ‘3 इडियट्स’च्या सीक्वेलमध्ये विकी कौशल?

**अभिनेता विकी कौशल शेवटचा २०२५ मधील ‘छावा’ या चित्रपटात दिसला होता. अशातच आता अभिनेता एका गाजलेल्या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये झळकणार आहे. हा चित्रपट म्हणजे आमिर खानची मुख्य भूमिका असलेला ‘३ इडियट्स’ असल्याची चर्चा सुरू आहे.**



आमिर खानने नुकतीच याबद्दल माहिती दिली आहे. अभिनेत्याने सांगितलं की दिग्दर्शक राजकुमार हिराणी या चित्रपटाच्या पात्रांवर काम करत आहेत. ‘३ इडियट्स’ हा चित्रपट प्रदर्शित होऊन आता दशकाहून अधिक काळ झाला असला, तरी त्याची लोकप्रियता अजूनही कायम आहे. विकी कौशलने याआधी राजकुमार हिरानी यांच्याबरोबर ‘संजू’ आणि ‘डंकी’मध्ये काम केलं आहे. आता ‘३ इडियट्स’च्या सीक्वेलची कथा त्याला खूप आवडली आहे. या माध्यमानुसार सीक्वेलमध्ये विकीच्या पात्रामुळे आमिर खान आणि इतर मूळ पात्रांबरोबर एक नवीन आणि भावनिक ट्विस्ट येणार आहे. उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार विकी कौशलने आमिर खानबरोबर काम करण्याची आणि या चित्रपटातील इतर कलाकारांबरोबर स्क्रीन शेअर करण्याबद्दल उत्सुकता व्यक्त केली आहे. विकी, आमिर आणि राजकुमार हिरानी यांच्या यासाठी अनेक भेटीही झाल्याचं म्हटलं जातं. विकीने ‘३ इडियट्स २’ मधील चौथ्या पात्रासाठी होकार दिल्याचं म्हटलं जातं. मात्र, संपूर्ण टीमचं वेळापत्रक जुळल्यानंतरच हा प्रोजेक्ट पुढे जाईल, अशी माहिती समोर आली आहे. २००९ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘३ इडियट्स’ या चित्रपटात आर.माधवन, शर्मन जोशी आणि करीना कपूर यांसारख्या कलाकारांची ऑनस्क्रीन मैत्री आणि केमिस्ट्री पाहायला मिळाली होती. त्यामुळे आता या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये काय पाहायला मिळणार याबद्दल प्रेक्षकांमध्येही उत्सुकता असेल.

# सोमनाथ मंदिर भारताच्या अविनाशी आत्म्याचे प्रतीक – राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**मुंबई (प्रतिनिधी) –** सोमनाथ मंदिर हे केवळ एक मंदिर नसून भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सनातन परंपरेच्या अविनाशी आत्म्याचे प्रतीक आहे. हजारो वर्षांच्या आक्रमणांनंतरही सोमनाथ मंदिर आजही दिमाखात उभे आहे, हीच भारताच्या सनातन शक्तीची साक्ष आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.



गुजरात येथील सोमनाथ मंदिरांच्या पुनर्बांधणीस ७५ वर्षे पूर्ण झाली असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ मे रोजी प्रभास पाटण येथे विशेष महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि परंपरेचा जागर घडवणारा सांस्कृतिक सोहळा 'सोमनाथ स्वाभिमान पर्व अतूट आस्थेचे १००० वर्ष या विशेष भक्तिपूर्ण कार्यक्रमाचे सांस्कृतिक कार्य विभागामार्फत श्री धाकलेश्वर महादेव मंदिर, मुंबई येथे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा बोलत होते. यावेळी इलेक्ट्रानिक, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता तथा सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, राज्यपाल यांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे, मंदिराचे व्यवस्थापकीय विश्वस्त अशोक भन्साळे यांनीही महादेवाचे दर्शन घेतले. यानंतर मान्यवरांनी 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' प्रदर्शनालाही भेट दिली.

सोमनाथ मंदिराच्या पुनर्स्थापनेच्या ७५ वर्षानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांना संबोधित करताना राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी सोमनाथ मंदिराच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्वावर प्रकाश टाकला. महमूद गझनीपासून औरंगजेबापर्यंत अनेक परकीय आक्रमकांनी मंदिर उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला, मात्र मंदिराचे अस्तित्व आणि त्यामागील श्रद्धा कधीही नष्ट होऊ शकली नाही, असे त्यांनी सांगितले. भारत हा केवळ भौगोलिक देश नसून तर तो एक चिरंतन संस्कृती आहे. विविध मंदिरे, साधू-संत आणि सनातन परंपरेमुळे भारताचा आत्मा आजही जिवंत आहे. 'सनातन' म्हणजे ज्याचा अंत नाही आणि सोमनाथ मंदिर हे त्याचे जिवंत उदाहरण आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रसिद्ध ओडिसी नृत्यांगना शुभदा वराडकर यांच्या नृत्याविष्काराने झाली. भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि परंपरेचा समृद्ध आविष्कार त्यांच्या सादरीकरणातून अनुभवायला मिळाला. सादर झालेल्या नृत्याविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचा युद्धविराम प्रस्ताव फेटाळला; अमेरिका-इराण तणाव पुन्हा पेटणार!

**वॉशिंटन (वृत्तसंस्था) –** अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेला तणाव पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. युद्धविरामासंदर्भात इराणने अमेरिकेच्या नव्या प्रस्तावाला पाकिस्तानमार्फत उत्तर पाठवले आहे. मात्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा प्रस्ताव तत्काळ फेटाळून लावत तो पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचे म्हटले. तथापि, प्रस्तावातील कोणत्या बाबींवर अमेरिकेची आक्षेपार्ह भूमिका आहे, हे त्यांनी स्पष्ट केले नाही.

इराणने म्हटले आहे की, त्यांना केवळ तात्पुरता नव्हे तर कायमस्वरूपी युद्धविराम हवा आहे. संघर्ष फक्त इराणपुरता मर्यादित न राहता लेबनॉनसह संपूर्ण प्रदेशात शांतता प्रस्थापित व्हावी, अशी तेहरानची मागणी आहे. तसेच समुद्री व्यापार आणि तेलपुरवठ्याच्या मार्गांची सुरक्षा सुनिश्चित करण्याचीही इराणची भूमिका आहे.अमेरिकेच्या प्रस्तावात युद्ध समाप्त करणे, रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाच्या होर्मुज सामुद्रधुनीला पुन्हा सुरू करणे आणि इराणच्या अणुकार्यक्रमावर मर्यादा आणण्याच्या अटींचा समावेश होता. होर्मुज सामुद्रधुनीला जगातील तेल आणि गॅस पुरवठ्यासाठी सर्वात महत्त्वाचा समुद्री मार्ग मानले जाते.



दरम्यान, ट्रम्प यांनी सोशल मीडियावर इराणवर टीका करताना म्हटले की, तेहरान गेली ४७ वर्षे अमेरिकेसोबत खेळ करत आहे, पण आता ते सहन केले जाणार नाही. संयुक्त राष्ट्रांतील अमेरिकेचे राजदूत माइक वॉल्ट्झ यांनी सांगितले की, अमेरिका पुन्हा युद्ध सुरू करण्यापूर्वी राजनैतिक प्रयत्नांना पूर्ण संधी देऊ इच्छिते. दुसरीकडे, इराणचे नवे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई यांनी युद्धाच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. सरकारी माध्यमांनुसार त्यांनी शत्रूविरोधात कठोर आणि निर्णायक कारवाई सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याचदरम्यान, खाडी प्रदेशातील ड्रोन हल्ल्यांमुळे तणाव आणखी वाढला आहे. कतारजवळ एका जहाजाला ड्रोन हल्ल्यामुळे आग लागली, तर संयुक्त अरब अमिराती आणि कुवेत यांनी आपल्या हवाई क्षेत्रात संशयास्पद ड्रोन दिसल्याचे सांगितले. यूएईने दावा केला की त्यांनी दोन ड्रोन पाडले असून त्यासाठी इराणला जबाबदार धरले आहे. मात्र या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. कतारने जहाजावरील हल्ला अत्यंत धोकादायक असल्याचे म्हटले असून त्यामुळे समुद्री व्यापार आणि आवश्यक पुरवठ्यावर धोका निर्माण झाल्याचे सांगितले आहे.

कुवेतच्या लष्करानेही ड्रोन हालचालींची पुष्टी केली, पण ते कुठून आले याबाबत माहिती दिली नाही. युद्धकाळात इराण आणि त्याच्या सहयोगी संघटना हिजबुल्ला यांच्याकडून सातत्याने ड्रोन हल्ले करण्यात येत आहेत. हा संघर्ष फेब्रुवारी महिन्यात अमेरिका आणि इस्रायल यांच्या संयुक्त हल्ल्यांनंतर सुरू झाला होता. इराणने असेही स्पष्ट केले आहे की, त्यांच्या अणुठिकाणांच्या सुरक्षेसाठी लष्कर पूर्णपणे सज्ज आहे. इराणी लष्करी अधिकाऱ्यांनी दावा केला की, परदेशी शक्ती घुसखोरी किंवा हेलिकॉप्टर मोहिमेद्वारे समृद्ध युरेनियम चोरण्याचा प्रयत्न करू शकतात, अशी त्यांना भीती आहे.

आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थाच्या माहितीनुसार, इराणकडे ६० टक्क्यांपर्यंत समृद्ध केलेले ४४० किलोहून अधिक युरेनियम आहे, जे अण्वस्त्रनिर्मितीच्या क्षमतेच्या जवळ मानले जाते.

# राज्य कामगार विमा योजनेच्या सेवा अधिक सक्षम करा – मेघना बोर्डीकर

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यातील कामगारांना अधिक दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य कामगार विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले. निर्मल भवन येथील एमएसआरटीसी कार्यालयात आयोजित बैठकीत त्यांनी राज्य कामगार विमा योजनेचा सविस्तर आढावा घेतला.



बैठकीत योजनेअंतर्गत नोंदणीकृत सदस्यांची संख्या, सदस्यांकडून प्राप्त होणारी वर्गणी, विमा योजनेअंतर्गत कार्यरत असलेले दवाखाने, नवीन दवाखाने सुरू करण्याबाबतची स्थिती तसेच राज्यातील कामगारांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या रुग्णशय्यांची माहिती याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी कामगारांना आरोग्य सुविधा वेळेत आणि गुणवत्तापूर्ण मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून, विमा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या रुग्णालये व दवाखान्यांची कार्यक्षमता वाढविण्याच्या सूचना दिल्या. औद्योगिक क्षेत्रांमध्ये वाढत्या गरजा लक्षात घेऊन नवीन दवाखाने सुरू करण्याच्या प्रस्तावांवरही त्यांनी चर्चा केली.

कामगार विमा योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या रुग्णशय्या, उपचार सुविधा, वैद्यकीय मनुष्यबळ आणि औषध उपलब्धता याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना उपचारासाठी कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी १५ मेपर्यंत स्व-जनगणना पूर्ण करावी - अपर आयुक्त डॉ. प्रताप काळे

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) –** अपर आयुक्त डॉ. प्रताप काळे यांनी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना भारतीय जनगणनेअंतर्गत अधिकृत संकेतस्थळावर स्व-जनगणना १५ मेपर्यंत पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. तसेच विभागीय लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणांवर संबंधित विभागांनी नियमांनुसार कार्यवाही करून अहवाल सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.



छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विभागीय लोकशाही दिनात मागील महिन्यातील सहा आणि नव्याने दाखल एका अशा एकूण सात प्रकरणांवर सुनावणी झाली. त्यापैकी दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली असून पाच प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत. या बैठकीस तहसीलदार (साप्रवि) के. के. भदाने, नायब तहसीलदार गजानन नांदगावकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. काळे म्हणाले की, जिल्हास्तरावरील लोकशाही दिनात न सुटलेले अथवा तक्रारदाराचे समाधान न झालेली प्रकरणे विभागीय स्तरावर दाखल केली जातात. विभागीय लोकशाही दिनात निर्णय दिल्यानंतरही अनेकदा क्षेत्रीय कार्यालयांकडून त्याची अंमलबजावणी वेळेत होत नाही किंवा संबंधित अर्जदाराला माहिती दिली जात नाही, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे सर्व विभाग प्रमुखांनी विभागीय स्तरावरील निर्णयांची गांभीर्याने अंमलबजावणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

तसेच क्षेत्रीय स्तरावर नागरिकांच्या अर्जांवर वेळेत मार्गदर्शन व योग्य तो निर्णय न झाल्याने नागरिकांना विभागीय स्तरावर धाव घ्यावी लागते. त्यामुळे नागरिकांचा नाहक त्रास होतो. संबंधित विभागांनी कायदेशीर बाबींची योग्य माहिती देऊन अर्जदारांचे समाधान करावे, जेणेकरून त्यांना वरच्या स्तरावर जाण्याची गरज भासणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.


## VEHICLE FOR SALE

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Vech no | Year | Model |
|---|---|---|
| MH-10-CR-2375 | 2015 | ICV TATA-1518 |

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before **18/05/2026**Offer reach after the sold date the company reserve the right to reject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED

IInd Floor, Parmar complex, Bafna T- Point, Nanded 431601

8108157969, 8108151742


## जाहीर प्रगटन

**विषयः मौ.भेंडेगाव बु ता. मुखेड येथिल सहधारकाचे सानुग्रह अनुदान वितरण करणेबाबत.**
**नोटिस क्र. 13,32,33,34,35**

उपरोक्त विषया अन्वये मौ.भेंडेगाव बु ता. मुखेड येथिल सहधारकाचे सानुग्रह अनुदान वितरण करणेबाबत नोटिस क्र. 25,28,29,30 अन्वये अनुक्रमे श्रीदेवी माहादप्पा पंचडे, शेषाबाई काशीनाथ पंचडे, माहादप्पा शिवबसआप्पा पंचडे, गोदाबाई शिवबसआप्पा पंचडे, आणि संगमनाथ माहादप्पा पंचडे यांचे नावे सानुग्रह अनुदान वाटप नोटिस देण्यात आलेली होती. परंतु सदर सानुग्रह अनुदानाचे नोटिस जमा कागदपत्राच्या अनुषंगाने अभिलेख तपासणी केले असता गट क्र. 19/11 19/6,19/8,19/9, व 19/7 या गटाच्या 7/12 वर ईतर अधिकारात धोंडीबा, गुणवंत, राधाबाई, परीबाई, कोंडाबाई यांच्या नावांची नोंद दिसुन येत असुन सदर व्यक्ती यांना अद्यापपर्यात अनुदान वाटपाबाबत संमती अथवा नाहरकत या कार्यालयास सादर केलेले नाही. तरी सदर नोटिसमधील भुधारकाचे त्यांच्या गट क्र. 19/11 19/6,19/8,19/9, व 19/7 मधील यांच्या हिस्साप्रमाणे वितरण करणेबाबत ईतर अधिकारातील सहधारकाचे संमती आहे किंवा कसे याबाबत पुढील 7 दिवसाच्या आत सादर करावे. विहीत मुदतीत संमती/नाहरकत प्राप्त न झाल्यास आपले काहिही म्हणणे नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | नोटिस क्र. | नोटिसधारक | अनुदान मागणीबाबतचा अर्ज प्राप्त | ईतर अधिकारात असलेले नोंद |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | 13 | तेजेराव अप्पाराव | तेजेराव अप्पाराव | धोंडीबा, गुणवंत, राधाबाई, परीबाई, कोंडाबाई |
| 2 | 32 | | | |
| 3 | 33 | | | |
| 4 | 34 | | | |
| 5 | 35 | | | |

(अनुप पाटील)
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी देगलुर

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड
दिनांक :

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक ७७३ /२०२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नांव : जय विठाई जन परिवर्तन संस्था उमरज ता. कंधार, जि. नांदेड

अर्जदार नांव : श्री व्यंकट जळबा गायकवाड

सर्व संबधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमूद केलेल्या अहवाल अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमूद केलेला सार्वजनिक न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचा आहे काय?

अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्याकडे सभासद फी रुपये ४५००/- जमा आहेत.

ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत या कार्यालयाच्या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास कांही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाच्या निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड यांचे शिक्यानिशी आज दिनांक ६/०५/२०२६ रोजी दिली.

(श्रीरामे बी. एन)
वरिष्ठ लिपिक
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

(श्री. एस. एम. जोशी)
(अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी
नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

## शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड

मुख्य कार्यालय, नवा मोंढा, नांदेड

## स्थावर मालमत्ता फेर लिलाव विक्री निवीदा सुचना

**(पहा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 156 व 1961 चे नियम 107)**

ज्या अर्थी शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड शाखा-संभाजीनगर येथील खालील थकबाकीदार सभासद यांनी कर्ज थकविल्याने बँकेनी कलम 101(1) अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळविले आहे. बरीच संधी देऊन सुध्दा कर्जदाराने थकित कर्ज रक्कम अधिक व्याज, अधिक सरचार्ज व इतर खर्चाप्रमाणे एकुण येणे रक्कम भरणा न केल्याने सदर कर्जदार थकबाकीदार यांच्या कर्जास तारण असलेल्या मालमत्तेपैकी खालील नमुद जप्त केलेली मालमत्ता, जेथे आहे, आणि जशी आहे तशी त्या स्थितीत सदर स्थावर मालमत्ता विक्रीसाठी मोहरबंद निविदा मागवुन मालमत्तेची विक्री करण्यात येत आहे. खालील नमुद केलेल्या स्थावर मालमत्तेची विक्री पुढील अटी व शर्ती नुसार करण्यासाठी इच्छुक निविदाधारकाकडुन निविदा मार्गविण्यात येत आहे.

**कर्जास तारण स्थावर मालमत्तेचे तपशील, निविदेची अंतीम तारीख, वेळ लीलावाची तारिख वेळ व ठिकाण खालील प्रमाणे नमुद केले आहे.**

| | |
|---|---|
| 1) कर्जदाराचे नांव | मे.अथर्व टेक्नो सिस्टीम प्रो.प्रा.विक्रम मधुकर कुलकर्णी आणि मधुकर उत्तम कुलकर्णी कर्ज खाते नं-201030151000047 |
| 2) तारण मालमत्तेचे वर्णन व मालमत्ता धारकाचे नाव | मोजे सोन्ना ता.सेलु जि.परभणी हद्दीतील शेत गट नं-10/02 मधील 0 हेक्टर 43 आर व 0 हेक्टर 70 आर एकुण क्षेत्रफळ 1 हेक्टर 13 आर शेत जमीन श्री.मधुकर उत्तमराव कुलकर्णी यांच्या नावाने आहे. |
| 3) एकुण थकित कर्ज येणे बाकी | दि.31.03.2026 अखेर मुद्दल रक्कम .30,00,378+ व्याज रक्कम 21,99,325= एकुण रक्कम 51,99,703/- व पुढील व्याज, दंड व्याज व इतर खर्च येणे बाकी आहे. |
| 4) निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख, वेळ | दि.22/05/2026, दुपारी 4:30 वाजेपर्यंत |
| 5) लीलावाचे तारिख वेळ | दि.25.05.2026, रोज सोमवार दुपारी 4:00 वाजता. |
| 6) लीलावाचे ठिकाण | शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड, मुख्य कार्यालय, पोकर्णा बिल्डींग, नवा मोंढा, नांदेड |

**लिलावाच्या अटी :-**

1. जंगम व स्थावर मालमत्ता जेथे आहे ज्यास्थितीत आहे त्यास्थितीत विकीसाठी मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.
2. निविदे सोबत रु.5000/- अनामत रक्कमेचा डी.डी. शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड शाखा नांदेड पेयल अॅट नांदेड या नावाचा असला पाहिजे, निवीदा फॉर्मची रक्कम 500/- राहील.
3. अनामत रक्कमेशिवाय आलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही. (अनामत रक्कम ही विना परतावा राहील)
4. निविदा भरणाऱ्यांनी मालमत्तेची पाहणी मौजे सोन्ना ता.सेलु जि.परभणी येथे करुन कार्यालयीन वेळेत शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड मुख्य कार्यालय, नांदेड येथे भरावी.
5. निवेदेमधील मालमत्ता विक्री करतांना पूर्ण स्थावर मालमत्ता विक्री करण्याचा अधिकार बँकेकडे राखीव राहील.
6. निविदेत स्थावर मालमत्ता विकत घेणे बाबत अपेक्षित किंमतीची स्पष्ट उल्लेख लेटर पॅडवर ठळक अक्षरात लिहुन शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड मुख्य कार्यालय, नांदेड ह्या पत्यावर दि 22/05/2026 दुपारी 04:30 वाजेपूर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावीत.
7. **आलेली मोहरबंद निविदा दि.25.05.2026 रोजी शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड मुख्य कार्यालय, नांदेड येथे दुपारी 4.00 वाजता उघडण्यात येईल. तरी संबंधितांनी शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड मुख्य कार्यालय, नांदेड येथे उपस्थित रहावे.**
8. ज्या व्यक्तीच्या नावाने निविदा सुटेल त्यास निविदेतील 25% रक्कम तावडतोब भरावी लागेल व उर्वरीत 75% रक्कम 15 दिवसाच्या आत भरावी लागेल.
9. एक किंवा सर्व निविदा सुटेल रदद करणे वा पुढे ढकलण्याचे किंवा विकी तहकुब करण्याचे अधिकार विशेष वसुली अधिकारी यांना राहील.
10. स्थावर मालमत्ते वरील सर्व कर भरावयाचा असल्यास सर्व कराची जबाबदारी घेणाऱ्यावर राहील.
11. निविदा सुटल्यानंतर 75% रक्कम 15 दिवसाच्या आत न भरल्यास खरेदीदाराने पूर्वी भरलेली 25% रक्कम जप्त करण्यात येईल. अशा परिस्थितीत खरेदीदारास संबंधीत मालमत्तेवरील कोणताही हक्क राहणार नाही.
12. खरेदीदारास खरेदीखतासाठी लागणारा सर्व खर्च स्वतः करावा लागेल.
13. मालमत्तेची रिजर्व्ह प्राईज रक्कम 19,80,000/- लक्ष (अक्षरी-एकोणीस लाख ऐंशी हजार रु.) एवढी राहील.

दिनांक : 11.05.2026
स्थळ : नांदेड

विशेष वसुली अधिकारी
शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड
मुख्य कार्यालय, नवा मोंढा, नांदेड

## Change In Name

My Old Name is **Satishkumar Kunjabihari Biyani**. which now I am changing as New Name **Satish Kunjabihari Biyani.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address: Somesh Colony, Behind Kalamandir, Nanded 431601
Mo.No. 9860913511

## Change In Name

My Old Name is **ALI AYESHABI AJAMAT**. which now I am changing as New Name **AYESHA BEGUM MOHAMMED SALEEM.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address: H NO 1-24-697 MAHARANA PRATAP CHOWK GOVIND NAGAR NEAR MOHAMMADIYA MASJID Taroda Bk. Taroda Bk Nanded Maharashtra 431605

## Change In Name


My Old Name is **Siddiqui Mohamed Abdul Azeem**. which now I am changing as New Name **Abdul Azeem Siddiqui Abdul Hafeez Siddiqui.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Sign By: Abdul Azeem Siddiqui Current Address: H.No 9-4-1584 Hafeez manzil Madina Nagar Degloor Naka Nanded.431604
Cell:9890862320


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५११००, ९७६७७११७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




पाणी टंचाई निवारणासाठी इसापूर धरणातून पाण्याचा विसर्ग

## नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा : जलसंपदा विभाग

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड व यवतमाळ जिल्ह्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांना दिलासा देण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशानुसार इसापूर धरण प्रकल्पातून पाणी सोडण्यात आले आहे. सर्व संबंधित गावातील ग्रामस्थांनी पाण्याचा वापर जपून व नियोजनपूर्वक करावा, असे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे.

नागरिकांनी कालवा, नाल्यातून बेकायदेशीर पाणी उपसा (पंपिंग) करू नये व पाण्याची नासाडी टाळावी. जेणेकरून सर्व गावांना पाणी मिळणे सोयीस्कर होईल. पाणी टंचाई निवारणासाठी जलसंपदा विभाग कटिबद्ध असून, उर्वरित पाण्याचे नियोजन वेळापत्रकाप्रमाणे केले जाईल, अशी माहिती उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता यांनी दिली आहे. ३० मार्च २०२६ च्या आदेशान्वये नांदेड जिल्ह्यासाठी ३ दलघमी पाणी सोडण्यात आले आहे. तर यवतमाळ जिल्ह्यासाठी ४.०० दलघमी व १ मे २०२६ च्या आदेशान्वये ५.०० दलघमी पाणी सोडण्यात आले आहे. विसर्ग व लाभक्षेत्र – इसापूर धरणातून थेट पाणी सोडण्यास्तव विमोचक नसल्याकारणाने कालवा प्रणालीमधून नियमित कालवा आवर्तनाचे वेळापत्रकाप्रमाणे संयुक्तीक होईल अशा विमोचकाद्वारे ५ एप्रिल २०२६ रोजी पासून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. ११ मे २०२६ अखेरपर्यंत एकूण मागणी १२.०० दलघमी पैकी ६.८१ दलघमी इतके पाणी नाल्याद्वारे प्रवाहित करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यातील गुरफळी, बाभळी, बनचिंचोली, वाटेगाव, हरडफ, धोत्रा, कामारी, पिंपरी, डोल्हारी, सिरपल्ली, सिल्लोड, एकंबा, कौठा, बोरगडी, धानोरा, वारंगटाकळी, मंगरूळ, साप्ती, मनुला (बु), म्हाटाळा, पेवा दिघी, घारापुर, पळसपूर, डोल्हारी व विरसणी या गावांचा समावेश आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील टाकळी, राजापूरवाडी, चालगणी, साखरा, खरुस, लोहरा, कारखेड, देवसरी, दिघडी, ऊंचवडद, सिंदगी, गांजेगाव, सावळेश्वर, भोजनगर, बिटरगाव, रतननाईकनगर, बोडका, पिंपळगाव, पेंदा, लिंगी, मुरली, मुळावा, हातला, दिवट, पिंपरी, पळशी, नागापूर, बारा चातारी, बोरी, कोप्रा, मानकेश्वर व सिंदगी या गावांचा समावेश आहे, अशी माहिती कार्यकारी अभियंता उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र. १ नांदेड यांनी दिली.

## नायगावात गॅस सिलेंडरचा तुटवडा; भरउन्हात ग्राहकांच्या लांबच लांब रांगा



**शंकरनगर (प्रतिनिधी)** – नायगाव येथील शगुन गॅस वितरण केंद्राच्या अनागोंदी कारभारामुळे नागरिकांना भर उन्हात तासन्तास रांगेत उभे राहण्याची वेळ आली आहे. तब्बल ४३ अंश तापमानात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्ग गॅस सिलेंडरसाठी रांगेत उभा असल्याचे चित्र सोमवारी पाहायला मिळाले.

नियमांनुसार गॅस सिलेंडरचे घरपोच वितरण करणे बंधनकारक असताना, गेल्या आठ दिवसांपासून ग्राहकांना स्वतः गोडाऊनवर जाऊन सिलेंडर घ्यावे लागत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. कुंटूरकर पेट्रोल पंपाजवळील गोडाऊन परिसरात सकाळी ६ वाजल्यापासूनच लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मात्र पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

घरपोच सेवा मिळत नसतानाही ९६० रुपये पूर्ण आकारले जात आहेत. मग अतिरिक्त पैसे नेमके कशासाठी घेतले जातात? असा सवाल संतप्त नागरिकांनी उपस्थित केला. काही नागरिकांनी तर गोडाऊनवर बोलावून अतिरिक्त चार्ज वसूल करण्याचा हा प्रकार आहे का? अशीही शंका व्यक्त केली. दरम्यान, भर उन्हात सामान्य नागरिक रांगेत उभे असताना संबंधित अधिकारी मात्र एसी गाडीत फिरत असल्याची टीका नागरिकांनी केली. सामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी अधिकारी या उन्हाच्या रांगेकडे येणार का? असा संतप्त सवालही नागरिकांनी उपस्थित केला. या प्रकाराकडे नायगाव पुरवठा विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप होत असून, सोमवारी संतप्त नागरिकांनी एजन्सी कर्मचाऱ्यांना जाब विचारत तीव्र नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे, नायगाव शहरासह १५ ते २० किलोमीटर अंतरावरून येणाऱ्या ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे. अनेकांना दिवसभर उन्हात थांबूनही गॅस मिळत नसल्याने संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. नायगाव शहरात पुन्हा गल्लोगल्ली गॅस वितरण सुरू न झाल्यास एजन्सीवर मोर्चा काढू, असा इशारा देण्यात आला.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यात १२ मे च्या सकाळी ६ वाजेपासून ते २६ मे २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १२ मे च्या सकाळी ६ वाजेपासून ते २६ मे २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमूद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

## तीन गुन्हेगारांकडून दोन खंजर जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या चंदासिंह कॉर्नर सूर्या गार्डनजवळ नांदेड ग्रामीण पोलिसांनी कारवाई करून तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून विनापरवाना बेकायदेशीररित्या दोन खंजर जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.

रविवार, दि. १० मे रोजी पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे व त्यांचे सहकारी यांनी सूर्या गार्डन कमानी समोरून अमोल संजय वाघमारे (वय २१ वर्षे व्यवसाय मजुरी रा. वडारगल्ली, संगत गुरुव्दारा जवळ इतवारा, नांदेड) हा त्याच्या ताब्यात विनापरवाना बेकायदेशीररित्या एक लोखंडी खंजर बाळगलेला मिळून आला आहे. तसेच भायेगावकर ऑटोमोबाईल दुकानाजवळ चंदासिंग कॉर्नर नांदेड येथे जसिदरसिंग रामसिंग दुधानीया (वय ३७ वर्षे व्यवसाय मजुरी रा. विवेक नगर अर्धापूर ह.मु चंदासिंग कॉर्नर, नांदेड) हा त्यांच्याकडूनही एक खंजर जप्त करण्यात आला. या सोबतच शेख आयान ऊर्फ आयान मार्क रा. देगलूर नाका, नांदेड याने विनापरवाना बेकायदेशीरित्या खंजर बाळगला. तसेच शस्त्रासह स्वतःचा फोटो काढून sajjad bhatti k या इन्स्टॉग्राम अकाऊटवर अपलोड केला. या प्रकारावरून आरोपीविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात पोलीस अमलदार हनुमंता कदम यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पथकाचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी कौतुक केले.


नांदासौख्यभरे

**कुबडे – गोरे**

नांदेड येथील रहिवासी अशोक कुबडे यांची ज्येष्ठ कन्या व रामचंद्र कुबडे यांची नात चि. सौ. कां. मयुरी यांचा शुभविवाह नांदेड येथील रहिवासी कै. बबनराव गोरे यांचे द्वितीय सुपुत्र व वामनराव गोरे यांचे नातू चि. प्रफुल यांचेशी कौठा परिसरातील मातोश्री मंगल कार्यालय येथे मंगळवार, दि. १२ मे २०२६ रोजी दुपारी १२.३५ वाजता संपन्न होत आहे. नवविवाहितांना भावी वैवाहिक जीवनासाठी अनंत सदिच्छा!

–मुख्यसंपादक


## प्रेम प्रकरणातून एकाला जबर मारहाण; १० लाखांच्या खंडणीची केली मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एकाला प्रेमप्रकरणाच्या कारणावरून बोलावून घेऊन जबर मारहाण केली. एवढेच नाही तर त्याच्याकडील दागिने, मोबाईल आणि स्कुटी हिसकावून नेली. तसेच १० लाखांच्या खंडणीची मागणी करणाऱ्यांविरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात जबरी चोरीसह इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ८ मे रोजी सायंकाळी ६ ते ६.१५ वाजण्याच्या सुमारास श्रीनगर, नांदेड येथील एका दुकानासमोर ही घटना घडली. आरोपी ऋषी सोनकांबळे, साई आणि अन्य एका अनोळखी युवकाने संगनमत करून आदित्य मद्रेवारला प्रेमप्रकरणातील चॅटींगबाबत बोलायचे आहे असे सांगून श्रीनगर भागातील पंचशील दुकानासमोर बोलावले. त्यानंतर मद्रेवारला वसरणी येथील पेट्रोल पंपाजवळील मोकळ्या जागेत नेऊन त्याला जबर मारहाण करण्यात आली. यावेळी त्याच्या डोक्याला, गळ्यावर आणि पायावर गंभीर दुखापत करण्यात आली.

आरोपींनी मद्रेवारच्या हातातील सुमारे दोन हजार रुपये किमतीची चांदीची अंगठी, कानातील दहा हजार रुपये किमतीची सोन्याची बाळी, दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन तसेच पन्नास हजार रुपये किमतीची स्कुटी असा एकूण ७२ हजारांचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेला. तसेच आरोपींनी त्याच्या नातेवाईकांना मोबाईल व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधून वेगवेगळी रक्कम अशी १० लाखांची मागणी केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. आदित्य देवानंद मद्रेवार (वय २४, रा. भवितव्य नगर, नांदेड) याच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३०९ (६), ३०८(४), ११८(२), ११८(१), २९६, ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

## राष्ट्रीय लोकअदालतीत २९ प्रकरणांचा सामंजस्याने निपटारा



**किनवट (प्रतिनिधी)** –येथील दिवाणी न्यायालयात शनिवार, दि. ९ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत बँकेच्या ११ व इतर दिवाणी स्वरूपाच्या १७ अशा एकूण २८ प्रकरणांचा सामंजस्याने निपटारा करण्यात आला. या प्रक्रियेत बँकेच्या प्रकरणातून ७ लाख, ८५ हजार ५०० व न्यायालयीन प्रकरणातून २ लाख, ११ हजार १२३ रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती न्यायालय प्रशासनाने दिली.

राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे परस्पर संमतीने मिटविण्यावर भर देण्यात आला. त्यामुळे संबंधित पक्षकारांचा वेळ, पैसा आणि न्यायालयीन प्रक्रियेतील त्रास मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, अनेकांना दिलासा मिळाला आहे. या लोकअदालतीत पॅनल प्रमुख म्हणून दिवाणी न्यायाधीश पी. एम. माने तसेच पॅनल सदस्य म्हणून ॲड. दीपा सोनकांबळे यांनी काम पाहिले. यावेळी सहदिवाणी न्यायाधीश के.जी. मेंढे यांची उपस्थिती होती. न्यायालयातील वकिलांनी प्रकरणे निकाली काढण्यासाठी सहकार्य केले.

## हुंडा किंवा देणगी न घेता संपन्न झाला आदर्श विवाह

**नांदेड (प्रतिनिधी)** –हुंडा किंवा देणगी न घेता नांदेड येथील गुंडेगावकर मंगल कार्यालयात आदर्श विवाह सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नांदेडच्या राजश्री पब्लीक स्कूलचे सचिव दिलीप पाटील गणेशपूरकर हे मराठा सेवा संघाच्या विचारांचे पाईक आहेत. लग्न सोहळ्यात हुंडा किंवा देणगी न घेता मुलांचे लग्न करा, या मराठा सेवा संघाच्या आवाहनाला प्रतिसाद देत पाटील यांनी त्यांचे चिरंजीव इंजि. हार्दिक यांच्या विवाह सोहळ्यात कोणत्याच प्रकारची देणगी किंवा हुंडा घेतला नाही. छत्रपती संभाजीनगर येथील प्रतापराव शिंदे यांची सुकन्या डॉ. नंदिनी व दिलीप पाटील यांचे चिरंजीव इंजि. हार्दिक यांचा विवाह सोहळा अत्यंत साध्या पद्धतीने संपन्न झाला.



अनिष्ठ रूढी व परंपरांना फाटा देवून विवाह संपन्न केल्याबद्दल पाटील व शिंदे परिवाराचा सत्कार कामाजी पवार, शिवाजीराजे पाटील, सतीश मुळे व मराठा सेवा संघाच्या वतीने करण्यात आला.

या विवाह सोहळ्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठाचे माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी मंत्री डी. पी. सावंत, माजी मंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष कामाजी पवार, ह.भ.प. उध्दव महाराज आपेगावकर, माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर, माजी आमदार डॉ. डी. आर. देशमुख, माजी आमदार राम पाटील रातोळीकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी न्यायाधीश भीमराव नरवाडे पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, भा.ज.पा.चे जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, सौ. आशाताई शिंदे, कंधारचे माजी नगराध्यक्ष अरविंद नळगे, नांदेड जि. प. चे माजी अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, संपादक केशव घोणसे पाटील, दिलीपराव धर्माधिकारी, शेतकरी नेते गुणवंत पाटील हंगरगेकर, कवी जगन शेळके, नगरसेवक सतीश बस्वदे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## 'मॉर्निंग वॉक ट्रॅक'जवळ रोहित्र बसविण्यास पाटबंधारे नगरच्या नागरिकांचा विरोध



**नांदेड(प्रतिनिधी)**–शहरातील कॅनॉल रोडपासून जवळच असलेल्या पाटबंधारेनगर भागात जुन्या जागेवर डीपी न बसविता नवीन जागेवर डीपी बसविला जात आहे. सदरील डीपी मॉर्निंग व इव्हिनिंग वॉक करणाऱ्या ट्रॅक जवळच बसविला जात आहे. त्यास नागरिकांचा विरोध असून याबाबत महावितरणला निवेदन देखील सादर करण्यात आले आहे. परंतु संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांची मिलीभगत असल्याने बिनदिक्कतपणे हे काम सुरू आहे.

महावितरण विभागाचे सहायक अभियंता तोटावार व संबंधित कंत्राटदार हे नियमांचे पालन न करता मॉर्निंग वॉक ट्रॅकजवळच हा डीपी बसवत आहेत. विशेष म्हणजे या भागात पूर्वी ज्या ठिकाणी डीपी आहे त्या ठिकाणी त्याची कॅपॅसिटी वाढवून सदरील काम करता येते किंवा पूर्वीच्या डीपीच्या जागेवर नवीन डीपी बसविता येतो. परंतु केवळ कंत्राटदाराची मर्जी सांभाळण्यासाठी हा प्रकार केला जात आहे, अशी या भागातील नागरिकांना शंका आहे.

ज्या ठिकाणी नवीन डीपी बसविला जात आहे, तो भाग म्हणजे पाटबंधारेनगर भागातील नागरिकांचा मॉर्निंग वॉक ट्रॅक आहे. त्या भागात दररोज शेकडो नागरिक मॉर्निंग व इव्हिनिंग वॉक करत असतात. तसेच लहान मुलेदेखील त्या ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेत सायंकाळच्या वेळेस खेळत असतात. ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी हा भाग अतिशय महत्त्वाचा आहे. नागरिकांच्या वर्दळीचा तसेच रहदारीचा हा भाग असल्यामुळे त्या ठिकाणी डीपीचा स्फोट किंवा स्पार्किंग झाल्यास भविष्यात मोठी जीवितहानी होऊ शकते. त्यामुळे सदरील जागेवर डीपी बसवू नये, अशी या भागातील नागरिकांची मागणी आहे.

महावितरण विभागाचे सहायक अभियंता तोटावार यांच्याशी याबाबत चर्चा केली असता त्यांनी 'जागा सरकली जाणार नाही, काय करायचे आहे ते करून घ्या. कोणाला सांगायचे आहे ते सांगा' अशा प्रकारे अरेरावी व उद्धट भाषा वापरली. तसेच यापूर्वी दोन जागा बदलून या तिसऱ्या जागेची आम्ही निवड केली असे त्यांनी सांगितले. असे असताना त्यांनी पूर्वीच्या दोन जागा कशामुळे बदलल्या? तसेच त्या जागा बदलण्याचा अधिकार आहे का किंवा नवीन जागा निवडत असताना शेजारच्या लोकांची ना हरकत घेतलेली आहे का? याचाही खुलासा महावितरणने करावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सध्या बसवीत असलेल्या जागेवर डीपी बसवू नये. अन्य जागेवर डीपी बसवावा किंवा पूर्वीचा डीपी ज्या ठिकाणी आहे, त्याच ठिकाणी हा डीपी बसवावा अन्यथा भविष्यात सदरील जागेवर डीपी बसविल्यामुळे काही अघटीत घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण व सहायक अभियंता तोटावार व संबंधित कंत्राटदारावर असेल, असेही निवेदनात म्हटले आहे.

## बनावट कागदपत्रांद्वारे शेतकऱ्याची फसवणूक; १८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव (महादेव) येथील शेतकरी अतुल पवार यांच्या शेताचा ताबा मिळविण्यासाठी बनावट दस्तावेज तयार करून तोतेगिरी करून फसवणूक करणाऱ्या १८ जणांविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पिंपळगाव शेत शिवारातील सुमारे १२ कोटी रुपये बाजारमूल्य असलेल्या शेतावर बनावट कागदपत्रांच्या आधारे ताबा घेण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आठरा जणांविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवार, दि. ९ मे रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पिंपळगाव (महादेव) शेत परिसरात आरोपींनी संगनमत करून फिर्यादीच्या शेतात प्रवेश केला. संबंधित जमीन आम्ही सौदाचिठ्ठी करून खरेदी केली असल्याचे सांगत त्यांनी जमिनीचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी आरोपींनी शिवीगाळ करून धमकावल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

## 'आयएफएस' परीक्षेत राज्यात प्रथम आल्याबद्दल निखिल जोशी यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)** –केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या भारतीय वन सेवा परीक्षा २०२५ चा अंतिम निकाल जाहीर झाला आहे. नांदेडच्या निखिल लक्ष्मणराव जोशी यांनी देशात १२ तर महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत यश मिळविले आहे. याबद्दल खंडू गुरु महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिधारा येथे दर अमावस्येला अन्नदान करणाऱ्या त्रिधारा खिचडी वाटप ग्रुपतर्फे निखिल जोशी यांचा सत्कार करण्यात आला.

निखिल जोशी आता आयएफएस अधिकारी होणार असल्याने पर्यावरण संरक्षण, वनसंपत्तीचे संवर्धन आणि जैवविविधतेचे रक्षण यावर काम करतील. या यशाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गजानन काळे, गजानन उतरवार, दत्तात्रय चिद्रावार, ऋषिकेश व्यवहारे, संतोष व्यवहारे, मारुती कन्नावार, अमोल कोटलवार, अमित मामीडवार, रवी गंजेवार, श्रीनिवास, चैतन्य बापू देशमुख, अरुण कन्नावार, संतोष कोलावार, सचिन पालदेवार, विवेक रेखावार, चेतन पांडे, बिपीन गादेवार, सतीश गोविंदवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com